बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३२७ ■ रविवार ३० ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८


॥ श्री गणेशाय नमः ॥
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

## नेपाळ महापुरातील मृतांची संख्या ६२६ वर पोहोचली
## मानसरोवर यात्रेसाठी गेलेले चारशे भाविक अडकले



**नवी दिल्ली, दि.२९- नेपाळमध्ये आलेल्या भीषण महापुराने मोठ्या प्रमाणावर हाहाकार उडवला आहे. या नैसर्गिक आपत्तीत अडकलेल्या भारतीयांबाबत आता मोठी माहिती समोर आली आहे. नेपाळमधील पूरग्रस्त भागांतून अद्याप ३२० भारतीय नागरिक बेपत्ता असल्याची अधिकृत माहिती भारतीय परराष्ट्र मंत्राल दिली आहे. याशिवाय भारतीय वंशाचे १०० हून अधिक नागरिक अद्याप संपर्काबाहेर आहेत. नेपाळमध्ये अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी भारत सरकारकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.**

नेपाळमध्ये सलग तिसऱ्या दिवशीही शोध आणि बचावकार्य सुरू असून, आतापर्यंत मृतांचा एकूण आकडा ६२४ वर पोहोचला आहे. भोटेकोशी नदीच्या पात्रातील पाण्याची पातळी अचानक वाढल्याने पुन्हा एकदा पुराचा धोका निर्माण झाला आहे. या संकटामुळे स्थानिक प्रशासनाची चिंता वाढली असून, सुमारे १,९२४ लोक अद्यापही बेपत्ता आहेत. यामध्ये ५१७ परदेशी पर्यटकांचा समावेश आहे. नेपाळच्या आठ जिल्ह्यांमधून आतापर्यंत ६२६ मृतदेह हाती लागल्याची माहिती नेपाळच्या पोलिसांनी दिली. नवलपारसी पूर्व जिल्ह्यत १५४ मृतदेह सापडले आहेत. आतापर्यंत सर्वाधिक जीवितहानी चितवन जिल्ह्यत झाल्याचे दिसत असून तेथे २३३ मृतदेह हाती लागली आहेत. अद्याप १,९२४ लोक बेपत्ता आहेत. नेपाळच्या पर्यटन मंडळाने माहिती दिली आहे की, आतापर्यंत ८५ भारतीयांसह १२१ परदेशी पर्यटकांची सुटका करण्यात आली आहे. त्यात ९ दक्षिण कोरियाचे आणि १६ चीनचे नागरिक आहेत. किमान ९३,००० लोक पूरस्थितीने प्रभावित आहेत, असा अंदाज रेड क्रॉसने व्यक्त केला आहे. तर १,७०० मुलांना तातडीची मदत असल्याचे युनिसेफने सांगितले.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जायसवाल यांनी पत्रकार परिषदेत दिलेल्या माहितीनुसार, कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेले सुमारे ४०० भारतीय नागरिक चीनच्या (तिबेट) सीमेवर अडकले आहेत. दिलासादायक बाब म्हणजे हे सर्व भाविक पूर्णपणे सुरक्षित (पान ८ वर)

## मनोज जरांगेंचे पुन्हा अंतरवालीत उपोषण

जालना, दि.२९- मराठा आरक्षणाच्या प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलनकर्ते मनोज जरांगे-पाटील यांनी शनिवारी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे बेमुदत उपोषण सुरू केले. हे आपले 'शेवटचे आंदोलन' असल्याचे सांगत मागण्या मान्य न झाल्यास मुंबईत मोर्चा काढून थेट 'वर्षा' बंगल्यासमोर ठिय्या मांडण्याचा इशारा त्यांनी राज्य सरकारला दिला. पात्र मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्रे देणे, जात पडताळणी समिती रद्द करणे आणि आरक्षणासंदर्भातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावणे, या प्रमुख मागण्यांसाठी जरांगे यांनी पुन्हा आक्रमक भूमिका घेतली आहे. जरांगे यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये कुणबी नोंदी असलेल्या सुमारे ५८ लाख व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्रे देण्याचा समावेश आहे. ज्यांचे अर्ज फेटाळण्यात (पान ८ वर)

## तापी खोरे विकास प्रकल्पाला पी.के.आण्णांचे नाव
## आ. राजेश पाडवींच्या सातत्याच्या पाठपुराव्याला यश

**शहादा,दि२९(का.प्र.)- शहादा-तळोदा विधानसभा मतदारसंघातील अत्यंत जिव्हाळ्याचा आणि महत्त्वाचा विषय असलेल्या तापी खोरे विकास प्रकल्पाला भागातील ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार स्वर्गीय अण्णासाहेब पी. के. पाटील यांचे नाव देण्याबाबत शासन स्तरावर गांभीर्याने विचार सुरू आहे. या संदर्भात तळोदा-शहादा मतदारसंघाचे आमदार राजेश पाडवी यांनी शासनाकडे सातत्याने आणि आग्रही पाठपुरावा केला होता. या मागणीची शासनाने दखल घेतली असून लवकरच यावर धोरणात्मक निर्णय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**



आमदार राजेश पाडवी यांनी तापी खोरे विकास प्रकल्पाला अण्णासाहेब पी.के. पाटील यांचे नाव देऊन त्यांच्या लोकसेवेचा व कृषी क्षेत्रातील योगदानाचा गौरव करावा, अशी मागणी राज्य शासनाकडे लावून धरली होती. या मागणीची शासन स्तरावर अत्यंत गांभीर्याने दखल घेण्यात आली आहे.राज्याचे माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली जलसंपदा विभागाचे मंत्री ना. गिरीश महाजन यांनी यासंदर्भात अधिकृत माहिती दिली आहे. सदर बाब धोरणात्मक स्वरूपाची असून सध्या शासनाच्या विचाराधीन आहे. शासनाचे धोरण अंतिम झाल्यानंतर आमदार राजेशदादा पाडवी यांच्या विनंतीनुसार या प्रस्तावावर सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे जलसंपदा मंत्र्यांनी कळविले आहे.माजी आमदार अण्णासाहेब पी. के. पाटील यांनी तापी परिसराच्या सिंचनासाठी आणि शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांचा हा वारसा आणि स्मृती जपण्यासाठी तापी खोरे विकास प्रकल्पाला त्यांचे नाव देणे ही संपूर्ण परिसराची आणि लोकभावना होती. हीच लोकभावना लक्षात घेऊन आमदार राजेशदादा पाडवी यांनी शासन दरबारी वारंवार (पान ८ वर)

## दोंडाईचातील दगडफेक प्रकरणी अखेर गुन्हे दाखल
## वेगवेगळ्या तीन फिर्यादी; सात जणांना केली अटक

**दोंडाईचा दि.२९ (प्रतिनिधी)- ईद-ए-मिलाद आणि इतर सण साजरे करण्याच्या पद्धतीबाबत व्हॉट्सपवर व्हिडिओ स्टेटस ठेवल्याच्या कारणावरून २८ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास गरीब नवाज कॉलनीत तीव्र वाद होऊन हिंसाचार घडला. या घटनेत जमावाने घरांवर तुफान दगडफेक करत वाहनाची मोडतोड करून आग लावली, तसेच बंदोबस्तावरील पोलिसांवरही हल्ला केला. याप्रकरणी दोंडाईचा पोलीस ठाण्यात एकूण तीन वेगवेगळ्या तक्रारींवरून गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.**

पहिली फिर्याद (गुन्हा रजि. क्र. २४३/२०२६)- फिर्यादी हासिम नसीर काकर (वय ४३, रा. गरीब नवाज कॉलनी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, व्हॉट्सप स्टेटसवरून झालेल्या वादातून संशयित आरोपी मुजाहिद बागवान, आरीफ मेहमुद शाहा उर्फ कालू शाहा आणि इतर १० ते १५ जणांच्या बेकायदेशीर जमावाने जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले. आरोपींनी फिर्यादीच्या घराला घेराव घालून दगडफेक केली, खिडक्यांच्या काचा फोडल्या आणि अंगणात उभी असलेली पल्सर दुचाकी पेटवून दिली. पोलिसांनी फिर्यादीला सुरक्षित बाहेर काढून शासकीय वाहनात बसवत असतानाही जमावाने पुन्हा पोलीस आणि फिर्यादीवर तुफान दगडफेक केली. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय बच्छाव करत आहेत.

दुसरी फिर्याद - पोलीस कर्मचाऱ्यावर हल्ला (गुन्हा रजि. क्र. २४४/२०२६):- दोंडाईचा पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल प्रशांत अशोक दामोदर (वय ३२) यांच्या फिर्यादीवरून मुजाहिद बागवान, आबीद खाटीक, शाकीब चुडीवाला, जुनेद खाटीक, कादीर बागवान, नूर पिंजारी, समीर, रहीम रंगरेज, मोईन शाहा, इम्रान खाटीक, जुबेर पिंजारी, अमिन मनियार, सुफीयान खान, बबलु खाटीक, आरीफ शाहा आणि इतर १५ ते २० जणांच्या (पान ८ वर)

## नफा देण्याचे अमिष पाच लाखात फसवणूक

धुळे, दि.२९- सोशल मीडियावर सोलर डीलरशिप बाबत आकर्षक जाहिरात देत नफा देण्याचे आमिष दाखविले, त्यातून दसेरा मैदान परिसरातील एका तरुणाची पाच लाखात फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात अज्ञातविरुद्ध गुन्हा दाखल झाला.शहरातील मालेगाव रोड परिसरातील मितेश लालचंद शेठीया (वय ३३, रा. विमलनाथ नगर विमलनाथ अपार्टमेंट दसेरा मैदान)यांनी सोशल मीडियाच्या इंस्टाग्राम या ॲपवर सोलर डिलरशीप बाबत आकर्षक जाहिरात पहिली. त्यावर मितेश सेठिया यांनी अर्ज केला. त्यानंतर त्यांच्या मोबाईलवर वेगवेगळ्या चार मोबाईल (पान ८ वर)

## साखर वाटप करून काँग्रेसचे अच्छे दिनवर आंदोलन
## महागाई, इथेनॉल भेसळ, साखरेच्या आयातीवरून निदर्शने

**धुळे, दि.२९- देशात सातत्याने वाढणारी महागाई, पेट्रोलमधील इथेनॉलचे भेसळयुक्त धोरण आणि ऐन सणासुदीच्या काळात साखरेची कृत्रिम टंचाई निर्माण करून जनतेची लूट करणाऱ्या केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांचा धुळे जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी व पदाधिकाऱ्यांनी शहरातील ऐतिहासिक शिवतीर्थ परिसरात जाऊन सर्वसामान्य जनतेला साखर खाऊ घालत अच्छे दिन आल्याची जोरदार व्यंग्यात्मक दाद दिली.**



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष श्री. भा. ई. नगराळे आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस डॉ. दरबारसिंग गिरासे यांच्यासह काँग्रेस नेत्यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. पूर्वी ३५ ते ४० प्रति किलो मिळणारी साखर आता थेट ७० ते ८० वर पोहोचली आहे. येत्या सणासुदीच्या काळात ही दरवाढ आणखी भडकणार असून बाजारात काळाबाजार (ब्लॅक मार्केट) सुरू करण्याचे नियोजन आखले गेले आहे. सरकारच्या या धोरणामुळे सुमारे ३६ ते ४० हजार कोटी रुपयांची लूट सर्वसामान्यांच्या खिशातून केली जात आहे. एकीकडे साखरेचे भाव गगनाला भिडले आहेत, तर दुसरीकडे उसाचा गैरवापर करून पेट्रोलमध्ये २० इथेनॉल मिसळले जात आहे. यामुळे नागरिकांच्या वाहनांच्या इंजिनचा (पान ८ वर)

## नरडाणेत एटीएम फोडले लाखोंची रोकड लंपास

धुळे, दि. २९- शिंदखेडा तालुक्यातील नरडाणा येथे मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी थेट स्टेट बँक ऑफ इंडियाचे एटीएम मशीन फोडून त्यातील रोकड लंपास केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. प्राथमिक अंदाजानुसार एटीएममध्ये सुमारे अकरा लाख रुपयांची रोकड होती. या धाडसी चोरीमुळे संपूर्ण परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने नरडाणा येथील स्टेट बँकेचे एटीएम लक्ष्य केले. ओळख लपवण्यासाठी चोरट्यांनी प्रथम एटीएम मधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर काळा स्प्रे मारला. त्यानंतर एटीएम मशीन जबरदस्तीने उखडून चारचाकी वाहनाच्या (पान ८ वर)




## शिवसेनेचे आंदोलन स्थळी नशेच्या पदार्थांचे प्रदर्शन; ॲड.असीम सरोदे यांनी दिली भेट

**धुळे, दि.२९- शहरासह जिल्ह्यातील अवैध धंदे वाढती गुन्हेगारी, नशेली पदार्थ विक्रीचे वाढते रॅकेट, मुद्द्यांवरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने ॲड. पंकज गोरे आंदोलनाला सुरुवात केली. आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी आंदोलन स्थळी नशेच्या पदार्थांचे प्रदर्शन मांडत ॲड.गोरे यांनी आंदोलनाकडे प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले. या आंदोलनाला ॲड. असीम सरोदे यांनी भेट देऊन सदर आंदोलनाची माहिती जाणून घेतली.**

या आंदोलनातून ॲड. पंकज गोरे यांनी शहरातील सट्टा क्लब,पत्यांचे क्लब, ड्रग्स विक्री, नशेली पदार्थ सर्रासपणे विक्री सुरू असून यामुळे विद्यार्थी-तरुण-पिढी या अवैध मार्गांकडे मोठ्या प्रमाणावर वळत असून यातून त्यांचे भविष्य खराब तर होतेच आहे परंतु कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो आहे. या प्रश्नाकडे ॲड. गोरे यांनी प्रशासनाचे या आंदोलनातून लक्ष वेधले आहे तसेच नशेचे पदार्थ, बनावट दारू विक्री यांची सर्रासपणे विक्री होत असून त्यावर देखील ठोस कारवाई करण्याची मागणी या आंदोलनातून करण्यात येत आहे. (पान ८ वर)

## सर्वोदय मंडळाच्या राज्य कार्यकारिणीची आज बैठक

धुळे, दि.२९- महाराष्ट्र प्रदेश सर्वोदय मंडळाच्या राज्य कार्यसमितिची बैठक आज (रविवारी) सकाळी १० वाजता राजेंद्र छात्रालयात आयोजित करण्यात आली आहे.या बैठकीत राज्यातील सद्य स्थितीवर चर्चा होऊन भूमिका निश्चित करण्यात येणार आहे.राज्य सरकारने ग्रामदान कायदा रद्द करण्याचा घाट घातला असून आचार्य भारतरतक विनोबांनी आदर्श गावांची संकल्पना मांडलेली आहे.महाराष्ट्रात ग्रामदानी गावे वीस असून येथील कारभार ग्रामसभेच्या माध्यमातून चालतो.जमिनीची संपूर्ण मालकी ग्राम मंडळाची असते.निवडणूक बिनविरोध होते. (पान ८ वर)

## भाजपची बारा वर्षांची इमेज कॉक्रोचने उध्वस्त केली- ॲड.असीम सरोदेंचे मत




**धुळे, दि.२९- निवडणुकांच्या माध्यमातून राजकारणाचे शुध्दीकरण होणे गरजेचे आहे. भाजपाने विविध पक्षांमधील भ्रष्टांना आपल्या पोटात सामावून घेतल्याने त्यांचे पोट फुगले आहे, ते केव्हाही फुटू शकते. वेगवेगळ्या पक्षांमधील घाण गोळा केल्याने त्याचे परिणाम दिसून येतील. सर्व पक्ष टिकले पाहिजेत. भाजपाची बारा वर्षांची इमेज कॉक्रोचने उध्वस्त केली असल्याचे मत संविधान विश्लेषक,** (पान ८ वर)

## किरकोळ कारणावरून तरुणावर चाकूने वार

धुळे, दि.२९- भरधाव मोटारसायकल चालविण्यास विरोध केला, यावरून येथील मोगलाई परिसरातील एका तरुणावर चाकूने हल्ला केल्याची घटना घडली. या प्रकारणी धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.नितीन संजय गवळी (वय १८, रा. गवळीवाडा, मोगलाई, साक्री रोड, धुळे) असे जखमीचे नाव आहे. शुक्रवारी (ता.२८) दुपारी दोनच्या सुमारास यशोदानंदन लॉन्सजवळुन युवराज संजय गवळी, अन्य नातेवाईकांसोबत तो जात होते. परिसरातील सुरज सचीन खांडेकर त्याच्या एका मित्रासोबत वेगात, वाकडी- तिकडी मोटरसायकल चालवित होते. (पान ८ वर)

## समृद्धी महामार्गावर प्रवासी सुरक्षित आहेत का?- रघुवंशींचा सवाल

**धुळे, दि.२९- संभाजीनगर येथून मुंबईकडे प्रवास करणाऱ्या एका कुटुंबाची गाडी रस्त्यात पंचर करण्यात आली आणि त्यानंतर तब्बल १० ते ११ जणांच्या टोळक्याने संबंधित कुटुंबाला लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.फळ, कपडे,रोख रक्कम तसेच सोने-चांदीचे दागिने लुटून नेल्याचा प्रकार अत्यंत गंभीर आणि चिंताजनक आहे.हा केवळ चोरी किंवा लुटीचा प्रकार नाही,तर समृद्धी महामार्गावरील प्रवाशांच्या सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारी घटना आहे. समृध्दी महामार्गावर प्रवासी सुरक्षित आहेत का? असा परखड सवाल काँग्रेसचे अलोक रघुवंशीयांनी प्रशासनाला केला आहे.**

लूटमारच्या घटनेतील गुन्हेगारांना गजाआड करण्यासाठी आता किती दिवस लागणार आहेत?समृद्धी महामार्गावर वाहतूक पोलीस, पोलीस व्हॅन आणि सुरक्षा यंत्रणा नेमकी काय करत होती? पोलीस व्हॅन एका ठिकाणी उभी ठेवणे एवढीच ड्युटी आहे का? महामार्गावर सातत्याने गस्त घालून प्रवाशांची सुरक्षा करण्याची जबाबदारी कोणाची? राज्यातील नागरिक आणि प्रवासी जर अशा प्रकारे महामार्गावर असुरक्षित असतील,तर राज्याच्या गृह विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.या घटनेतील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच समृद्धी महामार्गावरील पोलीस गस्त आणि सुरक्षाव्यवस्था तातडीने मजबूत करण्यात यावी. प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळण्यात गृह विभाग अपयशी ठरत असेल,तर राज्याच्या गृहमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तत्काळ राजीनामा द्यावा.अशी मागणीही रघुवंशी यांनी पत्रकाद्वारे केली आहे.

## चोरीस गेलेल्या मोटारसायकलीसह तीन गुन्हे उघड
## एल.सी.बी.ची कामगिरी; संशयितांकडून मुद्देमाल जप्त

**नंदुरबार, दि.२९ (प्रतिनिधी) - मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर नंदुरबार जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांनी अज्ञात चोरट्यांचा शोध घेऊन त्यांना जेरबंद करण्यासह चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेसह सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने तळोदा शहरातील दोन जबरीचोरीचे आणि उपनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका मोटारसायकल चोरीचा असे एकूण तीन गुन्हे उघडकीस आणले आहेत.**

तळोदा पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरील न उघडलेल्या गुन्ह्यांचा स्थानिक गुन्हे शाखेकडून समांतर तपास सुरू होता. दरम्यान, दिनांक २७ ऑगस्ट २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, तळोदा शहरातील भन्साली प्लाझासमोर तसेच ठाणेदार गल्लीत सहा ते सात दिवसांपूर्वी झालेल्या जबरीचोरीच्या घटना रोझवा, ता. तळोदा येथील तीन इसमांनी केल्या आहेत.

मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रोझवा येथे जाऊन तीन संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी आपली नावे संदिप रायसिंग नाईक (वय २१), युवराज सायसिंग नाईक (वय २३) आणि धिरेश रमेश नाईक (वय १९), तिघेही रा. रोझवा, ता. तळोदा, जि. नंदुरबार, अशी सांगितली.

पोलिसांनी केलेल्या चौकशीत आरोपींनी संगनमत करून जबरीचोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच जबरीचोरी करताना वापरलेली विना क्रमांकाची मोटारसायकलही त्यांनी चोरीची असल्याचे तपासात निष्पन्न झाले. सदर मोटारसायकल सुमारे दोन वर्षांपूर्वी जिजामाता कॉलेजसमोरील गेटजवळून चोरी केल्याची कबुली आरोपींनी दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

आरोपींकडून दोन जबरीचोरीच्या गुन्ह्यांतील मोबाईल फोन तसेच एक मोटारसायकल असा एकूण ३९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तीन गुन्ह्यांमध्ये तळोदा पोलीस ठाणे गु.र.नं. ४३२/२०२६, कलम ३०९(१), तळोदा पोलीस ठाणे गु.र.नं. ४३३/२०२६, कलम ३०९(१) व उपनगर पोलीस ठाणे गु.र.नं. २००/२०२४, कलम ३७९ आदिंचा समावेश आहे.

तपासात आरोपी मोटारसायकल चोरी करून त्याच मोटारसायकलचा वापर करत असल्याचे समोर आले. त्यानंतर ते सामान्यतः ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य करत त्यांच्या मोटारसायकलच्या मागून येत, त्यांना थांबवून त्यांच्या खिशातील मोबाईल बळजबरीने चोरून नेत असल्याचे निष्पन्न झाले आहे. ही कारवाई नंदुरबार जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक अश्विनी सानप आणि अपर पोलीस (पान ८ वर)

## उनपदेव येथे आदि.भिल्ल समाजाचा मेळावा संपन्न

शहादा,दि.२०(प्रतिनिधी)- तालुक्यातील उनपदेव या ठिकाणी आदिवासी भिल्ल समाजाचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात विविध शैक्षणिक सांस्कृतिक व वनौषधी वनस्पती यावर सखोल चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला दरा गावाचे सरपंच वसंतीबाई राहसे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून व वृक्ष लागवड करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रा.डॉ.खुमानसिंग वळवी, प्रा.ए एम वळवी, विजय महाले, सुदाम वळवी, सुभाष पाडवी, किरण (पान ८ वर)

## कृषी क्षेत्रात जगाला भारताकडून मोठ्या अपेक्षा
## मा.कुलगुरू प्रा.संजीव सोनवणे यांचे प्रतिपादन

**नाशिक, दि.२९ (प्रतिनिधी) - जगाला कृषीक्षेत्रात भारताकडून उत्पादन तंत्रे, कुशल मनुष्यबळ, कृषीतज्ञ तंत्रज्ञ याबाबतीत मोठ्या अपेक्षा आहेत. प्रगतीशील भारतातील आजचा शेतकरी हा केवळ साक्षरच नव्हे तर जागृत देखील आहे. आपल्या उत्पादित शेतमालाला योग्य बाजारभाव मिळण्यासाठी त्याला उत्तम मार्केटिंग ची गरज आहे. विद्यापीठाने त्या अनुषंगाने पारंपारिक कृषी शिक्षणक्रमांसोबत कृषीस पूरक असे पोर्टमॅनेजमेंट,वेअरहाऊसिंग संबंधित शिक्षणक्रम सुरु केलेले आहेत. माजी विद्यार्थ्यांनी देखील कृषी संबंधी नवीन शिक्षणक्रम प्रशिक्षण संदर्भात विद्यापीठास सुचना कराव्यात, त्याचा नक्कीच विचार केला जाईल. तसेच, शेती विकायची नाही हा संदेश प्रसारित करा असे आवाहन मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस केले.**




यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील माजी विद्यार्थी संघ व कृषि विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने माजी विद्यार्थी मेळावा संपन्न झाला. त्यात महाराष्ट्रातील विविध भागातून जवळपास २२५ विद्यार्थी सहभागी झाले. कृषि विज्ञान केंद्र सभागृहात झालेल्या या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यापीठाच्या कृषि विज्ञान विद्याशाखेचे माजी संचालक डॉ. सूर्या गुंजाळ तर ऑनलाईन पद्धतीने माजी विद्यार्थी व सध्या पश्चिम बंगाल येथे आयपीएस अधिकारी म्हणून कार्यरत असलेले (पान ८ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,45,400 रु.+3% GST
सोने- 24 K -1,58,000 रु.+3% GST
चांदी- 2,44,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## शिरपूर तालुक्यात एकशे तेरा मुलींना कर्करोग प्रतिबंधात्मक लसीचा डोस

**शिरपूर, दि.२९- एस.व्ही.के.एम. तपनभाई पटेल मेमोरियल हॉस्पिटल व अस्तित्व फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मुलींना भविष्यात गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावे, तसेच या गंभीर आजाराबाबत समाजात जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने विद्यमाने राबविण्यात आलेल्या कर्करोग प्रतिबंधात्मक लसीकरण उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमांतर्गत ११३ मुलींना लसीचा दुसरा डोस देण्यात आला.**




या लसीकरण मोहिमेचा पहिला डोस ४ फेब्रुवारी २०२६ रोजी मुलींना देण्यात आला होता. त्यानंतर निर्धारित कालावधीनुसार दुसरा डोस देण्यात आला. पहिल्या टप्प्यात लसीकरण झालेल्या मुलींपैकी ११३ मुलींनी दुसरा डोस घेतला. मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्राधान्य देत हा उपक्रम राबविण्यात आला.

गर्भाशय मुखाचा कर्करोग हा महिलांमध्ये आढळणाऱ्या गंभीर आजारांपैकी एक असून, त्याच्या प्रतिबंधासाठी योग्य वयात लसीकरण आणि आरोग्यविषयक जनजागृती महत्त्वाची आहे. लसीकरणामुळे भविष्यात या आजाराचा धोका कमी करण्यास मदत होते. त्यामुळे मुलींच्या आरोग्याचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने अशा प्रकारच्या प्रतिबंधात्मक आरोग्य उपक्रमांना विशेष महत्त्व आहे. लसीकरण मोहिमेच्या दोन्ही टप्प्यांत वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, रुग्णालयातील कर्मचारी तसेच स्वयंसेवकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. लसीकरणाची प्रक्रिया वैद्यकीय मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि सुरक्षित पद्धतीने पार पाडण्यात आली.

या मोहिमेतील विशेष बाब म्हणजे ४ फेब्रुवारी २०२६ रोजी १५० मुलींना पहिला डोस देण्यात आला होता, तर ६ ऑगस्ट २०२६ रोजी त्यापैकी ११३ मुलींना दुसरा डोस देण्यात आला. मुलींच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी सुरू करण्यात आलेल्या (पान ८ वर)

# मतदानापासून कोणीही वंचित राहू नये खबरदारी घ्या- डॉ.विजयकुमार गावित




**नंदुरबार, दि.२९- दीर्घ आजारपणामुळे शारीरिक हालचालींना मर्यादा असताना सुद्धा महाराष्ट्राचे माजी आदिवासी विकासमंत्री तथा आमदार डॉ.विजयकुमार गावित हे स्वतः बैठकीत उपस्थित राहिलेले पाहून कार्यकर्त्यांना सुखद आश्चर्याचा धक्का बसला.. आपले लाडके नेते डॉ.विजयकुमार गावित साहेब प्रत्यक्ष भाषण करून ठणठणीतपणे मार्गदर्शन करीत आहेत; हे पाहिल्यावर उपस्थित अनेक कार्यकर्त्यांना तर गहिवरून आले.. यामुळे काही क्षण सभागृहात भावनिक वातावरण बनलेले पहायला मिळाले.**

काल दि.२७ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी नंदुरबार शहरातील हॉटेल विधान इंटरनॅशनलच्या प्रशस्त सभागृहात माजी आदिवासी विकासमंत्री तथा विद्यमान भाजपाचे आमदार डॉ.विजयकुमार गावित यांच्या मार्गदर्शनाखाली व संसदरतक माजी खासदार डॉ.हिना गावित आणि भाजप अनुसूचित जमाती मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुप्रिया गावित यांच्या प्रमुख उपस्थितीत नंदुरबार विधानसभा मतदार संघातील मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण विषयीची आढावा बैठक पार पडली. त्यात हा प्रसंग घडला.

जिल्हा परिषदेच्या माजी सभापती हेमलता शितोळे, भाजपाचे तालुकाध्यक्ष दीपक पाटील, नगरपालिकेचे विरोधी गटनेते हिरालाल चौधरी माजी शहराध्यक्ष नरेश कांकरीया प्रकाशा मंडलाध्यक्ष विजय पाटील धानोरा मंडलाध्यक्ष गणेश चव्हाण व्यासपीठावर उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी पक्षातील विविध पदांवर नियुक्ती झाल्याबद्दल संतोष वसईकर, केतन रघुवंशी, शाम बापू मराठे, संगिता जयस्वाल, सरिता जयस्वाल, जगदीश पाटील, प्रकाश गवळे तसेच नंदुरबार विधानसभा क्षेत्रातील मंडळ अध्यक्ष यांचा सत्कार करण्यात आला.नंदुरबार विधानसभा प्रमुख जगदीश पाटील यांनी नंदुरबार विधानसभा आणि अन्य सर्व बी एल ए यांनी आपापल्या गावातील बुथवर केलेल्या एस आय आर विषयीचा आढावा मांडला.

दरम्यान, आजारपणाशी दीर्घकाळ झुंज देऊन परतल्यानंतर आ.डॉ.विजयकुमार गावित यांनी जनसंपर्क करण्याला लगेचच दमदारपणे सुरुवात केल्याचे पाहायला मिळत आहे. बंगल्यावर भेटीला येणाऱ्या कार्यकर्त्यांशी व पदाधिकाऱ्यांशी देखील त्यांनी नियमित संवाद सुरू केला. शनिमांडळ येथे प्रत्यक्ष जाऊन त्यांनी महाआरती केली आणि नंतर उपस्थित ग्रामस्थांशी संवाद देखील केला. ते सक्रिय झाल्याचे दर्शवणारा तो पहिला प्रसंग होता. त्यानंतर काल पार पडलेल्या आढावा बैठकीत सर्वांना पुन्हा सुखद धक्का बसला.

प्रमुख भाषणात डॉ. विजयकुमार गावित म्हणाले की, माझ्या अनुपस्थितीतही डॉ.हिना यांच्या समवेत आपण सर्वांनी चांगल्या प्रकारे कार्य सुरू ठेवले आणि विशेष काळजी घेतली त्याबद्दल सर्वांचा आभारी आहे. मतदानापासून कोणी वंचित राहणार नाही याची काळजी घ्यावी, तृटी न राहता वेगाने काम पूर्ण करावे. आपण सर्व परीश्रम करताहेत हे निश्चित कौतुकास्पदच आहे. डबल नोंदणी कोणी करणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन केले आणि सर्व उपस्थितांना रक्षा बंधनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

प्रमुख मार्गदर्शनात डॉ. हिना गावित म्हणाल्या की, एस आय आर चे आपल्या भागात ९० टक्के काम चांगले झाले आहे. आता उर्वरित काम मुदतीत पूर्ण करून सर्वात आघाडीचा मतदारसंघ म्हणून स्थान प्राप्त करूया. ऑनलाईन नोंदणी दिसणे आवश्यक आहे अन्यथा पक्षाला मुंबईत आपण शुन्य दिसतो. म्हणून आपापल्या बुथमधे काम करताना बीएलए टू, बीएलओ यांनी दक्षता घ्यावी आणि वेळेवर काम पूर्ण करावे, असेही डॉ.हिना गावित म्हणाल्या. डॉ.सुप्रिया गावित यांनी आपल्या भाषणातून तांत्रिक मुद्दे मांडले व मतदारांचे अर्ज तातडीने ऑनलाईन नोंद करणे किती गरजेचे आहे याची आवश्यकता विशद केली. प्रसंगी नंदुरबार विधानसभा मतदारसंघातील सर्व जिल्हा परिषद व पंचायत समितीचे माजी सदस्य, नगरसेवक, सरपंच, उपसरपंच, आजी माजी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# जि.प.,पं.स. आता स्विकृतांची नियुक्ती ग्रामविकास विभागाची अधिसूचना जारी

**मुंबई, दि.२९-महापालिका आणि नगरपालिकांच्या धर्तीवर आता जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्येही स्विकृत सदस्यांची नियुक्ती करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ग्रामविकास विभागाने यासंदर्भातील अधिसूचना जारी केली आहे. त्यामुळे आता विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ आणि अनुभवी व्यक्तींना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात सहभागी करून घेण्याची तरतूद करण्यात आली आहे.**

ग्रामविकास विभागाच्या अधिसूचनेनुसार, जिल्हा परिषदेत एकूण निर्वाचित सदस्यांच्या दहा टक्के किंवा किमान पाच यापैकी जी संख्या अधिक असेल तितक्या व्यक्तींची स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती केली जाणार आहे. पंचायत समितीमध्येही निर्वाचित सदस्यांच्या दहा टक्के किंवा किमान एक यापैकी जी संख्या अधिक असेल, त्यानुसार स्विकीकृत सदस्यांची नियुक्ती होणार आहे. राज्यात यावर्षीच्या सुरुवातीला झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत उमेदवारीची संधी न मिळालेल्या किंवा निवडणुकीत पराभूत झालेल्या इच्छुकांच्या राजकीय पुनर्वसनासाठी स्वीकृत सदस्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला होता. राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात यासंदर्भातील विधेयक मंजूर झाल्यानंतर ग्रामविकास विभागाने एकवीस ऑगस्ट रोजी अधिसूचना जारी केली.




**तज्ज्ञांसाठी पात्रतेचे निकष**

स्विकृत सदस्यपदासाठी अर्ज करणाऱ्या किंवा शिफारस केलेल्या व्यक्तीला जिल्हा परिषद प्रशासनासंदर्भात विशेष ज्ञान अथवा अनुभव असणे आवश्यक आहे. संबंधित व्यक्ती त्या जिल्हा परिषद क्षेत्राची रहिवासी असणे गरजेचे आहे. संबंधित क्षेत्रात किमान पाच वर्षांचा अनुभव किंवा विशिष्ट शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.मान्यताप्राप्त संस्थांमध्ये किमान पाच वर्षे कार्यरत असलेले डॉक्टर, मान्यताप्राप्त शाळा-महाविद्यालयांतील निवृत्त प्राध्यापक, व्याख्याते किंवा प्राचार्य तसेच कृषी, जलसंधारण, सहकार, ग्रामीण विकास, महिला व बालविकास, कला, साहित्य, अभियांत्रिकी, विधी आणि समाजकार्य या क्षेत्रांत किमान पाच वर्षांचा अनुभव असलेल्या तज्ज्ञांना पात्रता मिळणार आहे.

**पक्षीय संख्याबळानुसार जागावाटप**

स्विकृत सदस्यांच्या नियुक्तीची प्रक्रिया राबविताना जिल्हाधिकारी संबंधित जिल्हा परिषदेतील सर्व मान्यताप्राप्त व नोंदणीकृत पक्ष, गट किंवा आघाड्यांच्या नेत्यांशी सल्लामसलत करतील. त्यानंतर जिल्हा परिषदेतील पक्षीय तौलनिक संख्याबळाचा विचार करून स्विकृत सदस्यांच्या जागांचे वाटप केले जाणार आहे. तौलनिक संख्याबळ निश्चित करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या एकूण सदस्यसंख्येचा नामनिर्देशित सदस्यांच्या संख्येच्या आधारे विचार करून पक्षनिहाय जागा निश्चित करण्याची प्रक्रिया राबविली जाणार आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांची शिफारस महत्त्वाची**

जिल्हाधिकाऱ्यांनी शिफारस केलेल्या व्यक्तींच्या नावांचा जिल्हा परिषद विचार करून नियुक्ती करणार आहे. एखाद्या व्यक्तीची शिफारस अमान्य करायची असल्यास त्यामागील कारणे जिल्हा परिषदेला लेखी स्वरूपात नोंदवावी लागणार आहेत. स्विकृत सदस्यांच्या नियुक्तीत वैद्यकीय, शिक्षण, विधी, अभियांत्रिकी, समाजकार्य आदी विविध क्षेत्रांतील किमान एका तज्ज्ञ व्यक्तीला संधी देण्याचा प्रयतक करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या कारभारात तज्ज्ञ व्यक्तींच्या अनुभवाचा उपयोग होण्यास मदत होणार असली, तरी आगामी काळात या नियुक्त्यांमुळे स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणांनाही नवे वळण मिळण्याची शक्यता आहे.



# पटेल फार्मसी महा.त कार्यशाळा अठ्ठयाण्णव विद्यार्थ्यांचा सहभाग

**शिरपूर, दि.२९- जागतिक उद्योजक दिनानिमित्त शिरपूर येथील एच. आर. पटेल फार्मसी महाविद्यालयात विद्यार्थी इन्स्टिट्यूट इनोव्हेशन कौन्सिलच्या वतीने नाविन्यपूर्ण कल्पनांचे प्रभावी सादरीकरण या विषयावर अनुभवकथन व मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेत ९८ विद्यार्थी व २ शिक्षकांनी सहभाग नोंदविला.**

विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम व उद्योजकतेविषयी जागरूकता निर्माण करणे, नाविन्यपूर्ण कल्पना प्रभावीपणे मांडण्याचे कौशल्य विकसित करणे, सादरीकरण व संवादकौशल्य वृद्धिंगत करणे तसेच नवोपक्रमाशी संबंधित विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढविणे हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश असून नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रभावी सादरीकरणाची जोड आवश्यक आहे याकडे विद्यार्थ्यांनी लक्ष द्यावे असे मत प्राचार्य डॉ. एस.बी. बारी यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील कौन्सिलच्या विविध उपक्रमांची घोषणा करण्यात आली. विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन यश मिळवणाऱ्या महाविद्यालयाच्या यशस्वी विद्यार्थ्यांनी त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचा प्रवास व यशस्वी अनुभव उपस्थितांसमोर मांडला. यात गौरव भंडारे व लक्ष्मी जांगिड यांनी विचारमंथन स्पर्धा २.० मध्ये सर्वोत्कृष्ट व्यवसाय प्रारूप व नवउद्योग कल्पना तसेच सर्वोत्कृष्ट संशोधन ते नवउद्योग प्रस्ताव या विभागांत मिळविलेल्या तृतीय क्रमांकाच्या पुरस्काराची यशोगाथा सांगितली.

धीरज माळी व रिद्धी लाठी यांनी सर्वोत्कृष्ट कार्यरत नमुना तसेच सर्वोत्कृष्ट थेट उत्पादन या विभागांतील तृतीय क्रमांकाच्या पुरस्काराचा अनुभव विद्यार्थ्यांसोबत सादर केला. तृतीय वर्ष औषधनिर्माणशास्त्राच्या विद्यार्थिनी अर्पिता बर्डे व प्रणाली कोष्टी यांनी अस्ति-संजीवनी तत्काळ सूप मिश्रण या नाविन्यपूर्ण संकल्पनेचे सादरीकरण केले. संस्थेच्या माजी विद्यार्थिनी श्रुती चौधरी व प्रियांशु लढे, जे सध्या व्यवस्थापनशास्त्रातील पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत, यांनी अविष्कार स्पर्धेत नाविन्यपूर्ण कल्पना प्रभावीपणे कशी मांडावी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. बारी यांनी विद्यार्थी इन्स्टिट्यूट इनोव्हेशन कौन्सिल आणि संस्थात्मक नवोपक्रम परिषदेच्या आगामी कार्याबाबत अपेक्षा व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता समाजातील विविध समस्या ओळखून त्यावर नाविन्यपूर्ण उपाय शोधावेत आणि त्या कल्पनांचे प्रत्यक्ष नमुन्यांमध्ये रूपांतर करावे असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अदिती दायमा व शिला नाईक यांनी केले. आभार हर्षदा पाटील यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. पी. एस. दाभाडे, डॉ. आर. ई. मुथा, उदय कांबळे, हर्षदा पाटील, छाया तायडे यांनी परिश्रम घेतले.

सदर आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, सर्व संचालक, प्राचार्य डॉ. एस. बी. बारी यांनी समाधान व्यक्त केले.

# अतिक्रमण हटविणे मनपा प्रशासनाचे काम आ. अग्रवाल हटकरवाडी-राऊळवाडीतील रस्ते काँक्रिटीकरणाला प्रारंभ

**धुळे, दि.२९- शहरातील अतिक्रमण आणि अवैध धंद्यांच्या प्रश्नावरून सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर आ. अनुप अग्रवाल यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर भाष्य केले. अतिक्रमण हटविणे हे आमदाराचे काम नसून महानगरपालिका प्रशासनाचे काम आहे. प्रशासन आपल्या पद्धतीने काम करीत आहे, असे स्पष्ट करत त्यांनी आपल्या दीड वर्षांच्या आमदारकीच्या काळात अवैध धंद्यांविरोधात मोठ्या प्रमाणात कारवाया झाल्याचा दावा केला.**

प्रभाग क्रमांक १७ मधील हटकरवाडी आणि राऊळवाडी परिसरातील रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासाठी सुमारे दीड कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. या विकासकामाच्या भूमिपूजनप्रसंगी आमदार अग्रवाल बोलत होते. महापौर मायादेवी परदेशी, नगरसेवक अमोल मासुळे, नगरसेविका सुरेखा उगले तसेच परिसरातील नागरिक यावेळी उपस्थित होते.




**पंचवीस वर्षांनंतर रस्त्याचा प्रश्न मार्गी**

राऊळवाडी आणि हटकरवाडी भागातील रस्त्यांचा प्रश्न तब्बल २५ वर्षांपासून प्रलंबित होता. अखेर मूलभूत सोयी-सुविधांच्या निधीतून या रस्त्यांचे काँक्रिटीकरण सुरू होत असल्याने परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे. काम गुणवत्तापूर्ण झाले पाहिजे, अशी अपेक्षा आमदार अग्रवाल यांनी व्यक्त केली. संबंधित ठेकेदाराने दर्जेदार काम करावे, यासाठी आपण आग्रही असल्याचेही त्यांनी सांगितले.

**दोन नंबरचे धंदे**

**वर्षानुवर्षांची समस्या**

शहरातील अवैध धंद्यांबाबत माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नावर आमदार अग्रवाल यांनी विरोधकांवरही निशाणा साधला. दोन नंबरचे धंदे आज सुरू झालेले नाहीत. ही वर्षानुवर्षांची समस्या आहे. माझ्या आमदारकीच्या दीड वर्षांच्या कालावधीत अवैध धंदे बंद व्हावेत यासाठी प्रशासनाशी पत्रव्यवहार करून सातत्याने पाठपुरावा केला. माझ्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणावर अवैध धंद्यांविरोधात कारवाया झाल्या आहेत. कारवाया होत आहेत, याचा अर्थ प्रशासन काम करीत आहे, असे त्यांनी सांगितले. विरोधी पक्षाचे काम आरोप करणे, तर आमचे काम विकासकामे करणे आहे, असेही अग्रवाल यांनी स्पष्ट केले.

**निवडणुकीतील आश्वासनाच्या पूर्ततेकडे पाऊल**

महापालिका निवडणुकीच्या प्रचारादरम्यान राऊळवाडी आणि हटकरवाडी भागातील महिलांनी रस्त्यांची समस्या मांडली होती. हा परिसर नव्याने प्रभाग क्रमांक १७ मध्ये समाविष्ट झाल्यानंतर येथील रस्ते, गटारी, स्ट्रीट लाईट यांसह मूलभूत सुविधांचा प्रश्न सोडविण्याचे आश्वासन भाजपचे नगरसेवक अमोल मासुळे आणि नगरसेविका सुरेखाताई उगले यांनी दिले होते. या आश्वासनाच्या पूर्ततेच्या दिशेने रस्ते काँक्रिटीकरणाच्या कामाच्या माध्यमातून पहिले पाऊल पडल्याचे नगरसेवक अमोल मासुळे यांनी सांगितले. आगामी काळात परिसरातील अन्य समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

कार्यक्रमास महापौर मायादेवी परदेशी, नगरसेविका सुरेखा उगले, नगरसेवक अमोल मासुळे यांच्यासह परिसरातील उज्वला खलाणे, उषाबाई उघडे, सुरेखा थोरात, आशा धोंडे, आशा खलाणे, उषा सरोदे, जमुनाबाई सुपनर, स्वाती भवरे, आशा वाणी, रमाबाइ भवरे, लिनाबाई लिंगायत, विमलबाई भवरे, अनिता जाधव, जयाबाई सुपनर, रतका महाजन, वेणुबाई पंडीत, विशाल ठाकूर, रोहित सपकाळ, विक्की खलाणे, प्रमुख मान्यवरांमध्ये विकास बाबर, किशोर सरगर, जितू इखे, संतोष मासुळे, विकास शिंदे, विलास इंगवले, राजु सुपनर, राजु गंगावणे, नंदू सुपनर, श्रीरंग जाधव, मोनु हरळ, गुलाब भवरे, संदीप मालचे, संदीप रासकर, विक्की थोरात, प्रशांत सुर्यवंशी आदी उपस्थित होते

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

# व्यसनाधिनता व्यक्तीला दुर्बल करते ब्रम्हाकुमारी शिला दीदींचे प्रतिपादन

**पिंपळनेर, दि.२९- (प्रतिनिधी)- जीवन जगताना पैसे नसले तरी चालेल मात्र कुटुंबातील कोणतीही व्यक्ती व्यसनाच्या आहारी गेलेली नसावी. कारण व्यसनाधिनता ही गोष्ट प्रत्येक व्यक्तीला शारीरिक, मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल करत असते म्हणून चांगल्या गोष्टीचे आचरण करा,असे मौलिक प्रतिपादन साक्री येथील प्रजापिता ब्रह्मा कुमारी सेंटर च्या राजयोगिनी शीला दीदी यांनी केले.**




पिंपळनेर येथील कर्म.आ.मा. पाटील कला,वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन के पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि राष्ट्रीय छात्र सेना विभाग, आणि ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय सेंटर साक्री आणि ब्रह्मा कुमारी सेंटर पिंपळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने व्यसनमुक्त समाज विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.तेव्हा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या. याप्रसंगी पिंपळनेर वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ लहू पवार अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर पल्लवी दीदी आणि प्रतिभा दीदी उपस्थित होत्या.

शीला दीदी यांनी सांगितले की प्रत्येकाने निदान जणांना जरी व्यसनमुक्तीपासून दूर ठेवले तरी हा कार्यक्रम यशस्वी झाला असे आम्ही समजणार.म्हणून सर्वांनी या चांगल्या अभियानात सहभागी होण्यासाठी आवाहन केले.या प्रसंगी पल्लवी दीदी यांनी परमात्मा काय आहे. तो कसा काम करतो याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.लहू पवार यांनी सांगितले की देशाचे भविष्य हे तरुणाईवर आहे.म्हणून व्यसनांपासून दूर रहा आणि आरोग्य हेच धन हा मंत्र नेहमी जोपासा तुम्ही जीवनात यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून तुम्ही स्वतः तुमच्या नातेवाईकांना आणि मित्रपरिवाराला तंबाखू, गुटखा, विडी, सिगारेट,दारू इ.पासून लांब ठेवा जीवन सुख समृध्दीने भरल्याशिवाय राहणार नाही असे सांगितले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे सहाय्यक कार्यक्रमाधिकारी प्रा.एम. व्ही बळसाने यांनी केले.आभार राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रा.डी.बी जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.नितीन सोनवणे प्रा.डॉ.के एन वसावे, प्रा.भूषण भामरे ,प्रा. जयेश खैरनार, महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते नाशिक शहरात ई-बसेसचे लोकार्पण

**नाशिक, दि.२९- नाशिक शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक, पर्यावरणपूरक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पीएम ई-बस सेवा योजनेंतर्गत ई-बसेसचे नाशिककरांच्या सेवेत दाखल होत आहेत. या बसेसच्या माध्यमातून नागरिकांना विश्वासार्ह व दर्जेदार प्रवासाची सुविधा मिळणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

नाशिक शहरासाठी दाखल झालेल्या ई-बसेसचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी पालकमंत्री गिरीष महाजन, महानगरपालिकेच्या महापौर हिमगौरी आहेर-आडके, उपमहापौर विलास शिंदे, महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, केंद्र शासनाच्या पीएम ई-बस सेवा योजनेंतर्गत नाशिक शहरासाठी मंजूर करण्यात आलेल्या मीटर लांबीच्या ई-बसेस शहरात दाखल झाल्या आहेत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत आधुनिक ई-बसेसचा समावेश झाल्यामुळे नागरिकांना विश्वासार्ह व दर्जेदार प्रवासाची सुविधा मिळणार आहे. तसेच सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढल्यास खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होऊन शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासही हातभार लागणार आहे.

डिझेल बसेसच्या तुलनेत ई-बसेसच्या वापरामुळे परिचालन खर्चातही बचत होणार आहे. नाशिक शहराचा विकास आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी भविष्यात आणखी बसेस उपलब्ध होणार असून त्यातून नागरिकांना अधिक व्यापक आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध होणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

# शहादा पो.स्टेशनमध्ये रक्षाबंधनाचा कार्यक्रम

शहादा,दि.२९(प्रतिनिधी)- येथील कै.सौ.जी.एफ.पाटील कनिष्ठ महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना युनिट +२ स्तरच्या नियमित कार्यक्रम अंतर्गत शहादा पोलिस ठाण्यातील कर्मचाऱ्यांना राखी बांधण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, राष्ट्रप्रेम, सेवाभाव, शिस्त आणि सामाजिक जाणीव निर्माण करणारी महत्त्वपूर्ण विद्यार्थी चळवळ आहे. सेवा हीच साधना या भावनेतून स्वयंसेवक विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत असतात. राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या वतीने रक्षाबंधनानिमित्त पोलीस बांधवांना राखी बांधणे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शहादा पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक विनोद पाटील आदी उपस्थित होते.





प्रकाश में आज फंदेबाज




धर्मेद्र हेमा मालिनी मौसमी चटर्जी हेलन प्रेम चोपडा रंजीत बिंदु सत्येंद्र कपूर


## शब्दकोडे क्रमांक : २४४३



**आडवे शब्द :** १. मोठ्या प्रमाणावर होणारा गोंधळ किंवा आरडाओरड ३.पोळी किंवा चपाती बनवण्यासाठी वापरले जाणारे मुख्य धान्य ६.आकाशात चमकणारी चांदणी ७.पालनपोषण, संगोपन किंवा देखरेख ८.समाजातील प्रतिष्ठा ११.कलंक १३.संगीत क्षेत्रातील सात स्वरांचा समूह १६. जून,कणखर व्यक्ती २०.गुलालासोबत कपाळावर लावली जाते ती पूड २१.नदीचा किंवा समुद्राचा किनारा २२.ज्याला खरोखरच मदतीची आवश्यकता आहे असा व्यक्ती २५. रट-उलट लिहा २६.कपाळ या अर्थाचा शब्द २८.सैन्य,लष्कर किंवा लोकांचा मोठा समूह ३०. अपकीर्ती झालेला व्यक्ती ३३.आदर, प्रतिष्ठा किंवा सन्मान ३४.प्रयत्न किंवा धडपड ३६. मेजवानी किंवा जेवणाचे आमंत्रण ४०.माराचे वण ४१.प्रियकर,मित्र या अर्थाचा उर्दू शब्द ४२. नोकर,सेवक ४३.मनात असलेली टोचणी किंवा सलणे ४४. जुन्याच्या विरुद्ध असलेला,नवीन किंवा कोरा ४५.मोठे शहर ४७.शेतात पिकांच्या उत्तम वाढीसाठी टाकले जाणारे द्रव्य,पत्र -हिंदीत ४९.त्या प्रकारे किंवा तशाच पद्धतीने ५१.रक्त किंवा रुधिर या शब्दासाठी वापरला जाणारा शब्द ५४. पाणी-पुरीच्या गादीवर मिळतो तो खाद्यपदार्थ ५५.जीवानिशी मारणे किंवा जागच्या जागी संपवणे ५६.नशीब, भाग्य-इंग्रजीत ५७.हिंदीत-वेळ **उभे शब्द :** १.नाहीसे होणे व झालेला २.तीव्र राग, संताप किंवा असंतोष ४.उत्तम, उत्कृष्ट किंवा अतिशय सुंदर ५.दिनांक ९.चित्र, प्रतिमा किंवा हुबेहूब फोटो १०.शरीर, अवयव किंवा शरीराचा हिस्सा १२. फणसाच्या आतील मगज १४. रड १५.हेतू १७.फसवणूक करणारा,चोर किंवा लुबाडणारा व्यक्ती १८.चालू दिवस किंवा सद्य सुरु असलेला दिवस १९. लोकांची निर्घृण केलेली हत्या २०.कैद २३.शोभा, पद्धत किंवा डौलदारपणा २४.नमस्कार किंवा आदरपूर्वक केलेले अभिवादन २७. आईचे वडील-हिंदीत २९.ममता, प्रेम, आपुलकी किंवा जिव्हाळा ३१.करुणा, कृपा किंवा दुसऱ्याबद्दल वाटणारी अनुकंपा ३२.दुपार ३३.खेळातील पराभव, हार किंवा शह देणे ३५.निश्चय ३७. उलटी,ओकारी किंवा वांती होण्याची क्रिया ३८.मोठा विनाश, नुकसान किंवा तोटा ३९.मजबूत मनःस्थितीचा ४१.प्रश्न,पेच किंवा जाब विचारणे ४२.घराचा मुख्य दरवाजा ४६.किल्ला,दुर्ग ४८.टिकाव ५०.एखाद्या वस्तूची केलेली साठवणूक ५२.हुलकावणी देणे, चकवणे किंवा खोटी भीती दाखवणे ५३.कठोर-हिंदीत

### शब्दकोडे क्रमांक : २४४२ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | न | रा | ज | ■ | मि | र | र | ■ | स | ल | ग |
| ल | ग | ■ | व | द | न | ■ | स | का | ळ | ■ | ड |
| य | ■ | खु | ळा | ■ | ल | ढा | ■ | र | ई | स | ■ |
| ■ | ज | रा | ■ | वा | ■ | ल | सू | ण | ■ | ह | त्ती |
| घी | ■ | प | र | व | ड | ■ | त | ■ | ग | ज | ■ |
| ■ | भा | त | सा | ■ | गा | ठ | ■ | क | ट | ■ | तो |
| जं | त | ■ | त | डा | ■ | रा | व | स | ■ | क | र |
| ग | ■ | मा | ळ | ■ | ना | व | ■ | र | म | मा | ण |
| ■ | ब | घा | ■ | प | ग | ■ | चा | ■ | सा | न | ■ |
| मा | ■ | र | डा | र | ■ | लो | क | क | ला | ■ | स |
| र | सा | ■ | स | वा | ल | ■ | र | द | ■ | ना | ल |
| वा | य | दा | ■ | ना | स | का | ■ | र | वा | न | गी |

आपला महाराष्ट्र
www.aplamaharashtra.in

# बहर





प्रा.डॉ.मधुकर जाधव
मो.९९७५५४६०२०

## विश्वातील महान राजे

# श्रेष्ठ संरक्षक दल

छत्रपती शिवाजी महाराजांचे संरक्षक दल जगात श्रेष्ठ होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे अंगरक्षक दल अत्यंत तल्लख, एकनिष्ठ आणि शूर मावळ्यांचे बनलेले होते. महाराजांनी स्वसंरक्षणासाठी एक विशेष आणि स्वतंत्र संरक्षक दल निर्माण केले होते. खास प्रशिक्षीत असे हे दल कायम सज्ज असे. या संरक्षक दलाच्या माध्यमातून स्वराज्यामध्ये आदर्श अशी संरक्षण व्यवस्था निर्माण केली. आधुनिक युध्दतंत्रात कमांडोज नावाचा प्रकार सर्वांनाच माहित आहे. त्या प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांचे सारेच सैनिक कमांडोज होते. संरक्षक दलामध्ये शिस्तीला अत्यंत महत्व होते. शांतता, सुव्यवस्था, नियोजन, नियंत्रण ही संरक्षण व्यवस्थेची वैशिष्ट्य होती. छत्रपतींच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी या दलाची असे. छत्रपतींचे राहण्याचे ठिकाण, निवासस्थान, भोजन व्यवस्था अशा ठिकाणी संरक्षक व्यवस्था अतिशय कडक असे. निष्ठावंत व पराक्रमी सैन्याची भरती संरक्षक दलात केली जात असे. छत्रपतींनी शौर्य आणि बुध्दीमत्तेवरती प्रत्येक मोहिम यशस्वी केली. स्वराज्यातील संरक्षक दल नैतिक तत्वाशी जोडलेले आदर्शाचे प्रतिक होते.



संरक्षक दलाची निवड- सुरक्षितेच्या दृष्टीने काळजी घेण्यासाठी महाराजांनी अतिशय उत्कृष्ट संरक्षक दल निर्माण केले. या संरक्षक दलात प्रामाणिक, विश्वासू, कर्तव्यदक्ष व चतुर सैनिकाची निवड केली जात असे. छत्रपती त्यांच्या प्रामणिकपणाची परीक्षा स्वतः घेत असत. हे सैनिक छत्रपतींच्या खास विश्वासातील असत. संरक्षक दलातील हे अंगरक्षक नेहमी छत्रपतींच्या सोबत राहत असत. डोळयात तेल घालून ते छत्रपतींचे रक्षण करीत. उत्कृष्ठ कामगिरीनंतर महाराज त्यांना उंची वस्त्रे, पोशाख, मोहनमाळा, अलकार बक्षिस म्हणून देत असत.

साहस, धाडस, शौर्य व धौर्य- नियोजनपर्वक साहस व धाडस हे छत्रपतींच्या संरक्षक दलाचे वैशिष्ट्य होय. छत्रपतींनी निर्माण केलेला प्रचंड विश्वास व जनतेवरील श्रध्दा यावर युध्दकौशल्याचे डावपेच निर्माण केले.धाडस व शौर्य या बाबतीत छत्रपती जगात सर्वश्रेष्ठ होत. ते सदैव जागरूक व सावधान राहिले म्हणून राजे कोणत्याही आणीबाणीच्या प्रसंगाला तोंड द्यायला कायम सज्ज असत.एक डोळा सदैव उघडा असल्याप्रमाणे त्यांची झेप सावध असे. त्यांचे धाडस, संरक्षण व शौर्याच्या बाबतीत ऑर्म म्हणतो ''एका हातात तेजस्वी तलवार घेऊन घोडदौड करीत छत्रपती शिवाजी महाराज शत्रूच्या प्रदेशावर चालून जात असत. हा प्रसंग त्यांनी आपल्या डोळयांनी पाहिल्याने त्यांचे सैनिक इतरांना अभिमानाने सांगत असत. छत्रपतींचा स्वभावच मुळात धाडसी व साहसी होता. नियोजनपूर्वक साहस हे त्यांचे श्रेष्ठत्व होते. स्वराज्यामध्ये स्वतःचे धाडस, सैनिकांचे व सेनापतींचे शौर्य यांचा संगम झालेला होता. छत्रपतींनी धाडस व साहस यातुन अनेक अशक्य गोष्टी साध्य केल्या. अफझलखान वध, पन्हाळगडाहून सुटका, शाहिस्तेखान प्रकरण, आग्याहून सुटका हे सर्व साहस व धाडसाची प्रकरणे आहेत.

शस्त्र सज्जता- संरक्षक दलाचा संपूर्ण खर्च सरकारी तिजोरीतुन केला जात असे. त्यांना अतिशय कलाकुसर केलेली पागोटी दिली जाई. त्यांची जाकिटे जाड कपडयाची असत. त्यांच्या कानांत सोन्याच्या किंवा चांदीच्या वाळया असत, हातात सोन्या-चांदीची कडी असे. त्यांच्या तलवारीची म्याने, बंदुका, भाले हे चांदीने मढवलेले असत. अफजलखानाच्या भेटी प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांच्या सोबतीला अत्यंत विश्वासू अंगरक्षक होते. संभाजी कावजी कोंढाळकर, येसाजी कंक, जिवा महाला, सिद्दी इब्राहिम, कोंडाजी कंक, कृष्णा गायकवाड, संभाजी करवर, सूर्याजी काटके, काताजी इंगळे आणि विसाजी मुरुंबकर हे शरीररक्षक सोबत होते. या शरीररक्षकांनी खूप मोठे शौर्य गाजविले. संरक्षक दलाकडे बंदुकधारी,भालेकरी आदि. प्रकारची हत्यारे बाळगणारे हत्यारबंद असे सैनिक होते.जे कार्यतत्पर व शूर योध्ये होते.

नियमाचे पालन व तत्पर ॲक्शन-नियमाचे पालन प्रत्येकाला काटेकोरपणे करावे लागे. छत्रपतींच्या युध्दनीतीची मीमांसा करताना इतिहासकार एस. एन. सेन म्हणतात, 'छत्रपती शिवाजी महाराजाच्या स्वराज्यात अशी एकही महत्वाची टेकडी उरली नव्हती जिथे संरक्षणासाठी चौक्या वा पहारे लावले नव्हते'. यावरून छत्रपती शिवाजी महाराजांची संरक्षणव्यवस्था किती श्रेष्ठ दर्जाची होती हे आपल्या लक्षात येते. इ. स. १६६४ च्या सुरत स्वारीच्या वेळी सुरतेच्या सुभेदाराच्या मारेक-याने छत्रपतींवर अचानक हल्ला करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा छत्रपतींच्या संरक्षक दलाने क्षणाचाही विलंब न लावता छत्रपतींना इजा होण्यापूर्वीच शस्त्रासकट त्याचा हात वरच्यावर छाटला.

सक्षम युध्दतंत्र- छत्रपती शिवाजी महाराजांनी योग्य ती संरक्षण व्यवस्था उभी केली. त्याला निसर्गाची ही साथ मिळविली. पूर्वीचे राजे, राजवाडे प्राण्यांच्या झुंजी लावीत, शिकारी करीत. त्या गमतीसाठी परंतु महाराजांनी त्या प्राण्यांच्या लढण्याचाही अभ्यास केला. शिकारीत सावजाचे डावपेच कसे असतात हे लक्षपूर्वक पाहून त्याचा अभ्यास केला. वाघ, सिंह, लांडगे आपल्या बलाढ्य भक्षाला घेरून त्याला नामोहरण कसे करतात. ते ही अभ्यासले आणि प्रत्यक्ष रणांगणावर त्याचा उपयोग केला. त्यांनी आपल्या सक्षम युध्दतंत्राच्या साहयाने बलाढ्य शत्रूवर विजय मिळविले. त्यांच्या वेगवान युध्दतंत्राला दमदार घोड्याची साथ मिळाली व चिवट मावळयांच्या साहयाने शत्रूला धडकी बसविणारे स्वतंत्र युध्दतंत्र निर्माण केले.

संरक्षक दलाचे गुण- छत्रपती शिवाजी महाराजांच्या संरक्षक दलात तलवारबहाद्दर, भालेकरी, विटेकरी, बंदुकधारी, तोफखाना बाळगणारे आदि. प्रकारचे हत्यारबंद सैनिक होते. शौर्य, कसब, निष्ठा, धाडस या गुणांवर संरक्षक दलाची नेमणूक केली जात असे. जवळ जवळ २००० संरक्षक दलाची फौज छत्रपतींच्या बरोबर असे. स्वराज्याच्या संरक्षक दलात निष्ठावंत व पराक्रमी सैनिकांची भरती केली जात असे. संरक्षक दलाचा पगारही इतर सैन्यापेक्षा जास्त असे.

कडक नियम- छत्रपती शिवाजी महाराज लष्करी तज्ञ होते. ते कसलेले योध्दे होते. आधुनिक राष्ट्रप्रमुखांच्या संरक्षणासाठी डोळयात तेल घालुन वावरणारी कमांडो पलटण आपण पाहतो तशाच प्रकारची पलटण उभारून स्वतः भोवती संरक्षणाचे एक अभेध कवच उभारले. छत्रपती शिवाजी महाराजांचे खास असे ५००० संरक्षक कमांडोज होते. ते नेहमी सज्ज असत.

डच फॅक्टरी रेकॉर्डमधील संरक्षक दलाचे वर्णन- छत्रपती शिवाजी महाराजांच्या खास संरक्षक दलाचे शौर्य अनेक ठिकाणी दिसुन आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे, शिस्तीचे व कौशल्यपूर्ण हालचालीचे वर्णन डच फॅक्टरी रेकॉर्डमध्ये आढळते ते असे ''इ.स.१६७६ च्या ऑगस्ट महिन्यात छत्रपती शिवाजी महाराज व गोवळकोंड्याच्या सुलतानाची भेट झाली. भेटी वेळी हजर असलेल्या डच प्रवाशाने जी माहिती दिली आहे ती अशी, ''छत्रपती शिवाजी महाराज व गोवळकोंडयाचा सुलतान बोलत असताना थोड्याच वेळांत ती सर्व जागा महाराजांच्या ६००० घोडेस्वारांनी वेढून टाकली. ते इतक्या हळू हळू आले की एखाद्या माशीच्या उडण्याचा सुध्दा आवाज ऐकू आला असता''.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अतिशय उत्कृष्ट संरक्षक दल निर्माण केले. या संरक्षक दलात प्रामाणिक, विश्वासू, कर्तव्यदक्ष व हुशार सैनिकांची निवड केली. संरक्षक दलातील सैनिक छत्रपतींच्या खास विश्वासातील असत. या संरक्षक दलाची शिस्त कठोर असे. स्वराज्याच्या लष्करातील शूर, लढवय्ये, एकनिष्ठ व हुशार सैनिकांना संरक्षक दलात स्थान दिले जात असे. छत्रपती त्यांच्या प्रामाणिपणाची परीक्षा स्वतः घेत असत. ते मोहिमा, स्वा-यांच्या वेळी ही छत्रपतींवर करडी नजर ठेवून असत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या संरक्षक दलाने स्वराज्याच्या निर्मितीमध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. स्वराज्याचे संरक्षक दल निष्ठा आणि शौर्याचे प्रतिक होते.

# सोशल मीडिया
## चिंता आणि चिंतन



विकास कपोले
धुळे, मो.९४०३४२५७७७

आजच्या धावपळीच्या युगात 'माणूस' सामाजिक राहिला आहे की 'सोशल', हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत आपल्या हातातील पाच-सहा इंचाचा स्क्रीन आपली दुनिया बनला आहे. ''कनेक्टिंग पीपल'' म्हणता म्हणता आपण प्रत्यक्ष माणसांपासून मात्र दूर जात आहोत का? यावर चिंतन करण्याची वेळ आली आहे.

२. आभासी आनंद आणि निराशेचे चक्र

तुम्ही म्हटल्याप्रमाणे, आजचा तरुण वर्ग आणि प्रत्येक व्यक्ती या आभासी जगाच्या आहारी गेली आहे.

लाईक्स आणि कमेंट्सचा सापळा: आज आपण एखादा फोटो पोस्ट करतो आणि किती लाईक्स आले, हे दर पाच मिनिटाला चेक करतो. जास्त कमेंट्स आल्या तर आपण हवेत तरंगतो आणि कमी आल्या तर उदास होतो.

प्रमाणीकरण - आपल्या आनंदाची चावी आपण अनोळखी लोकांच्या कमेंट्समध्ये ठेवली आहे. हा स्वभावातील बदल मानसिक आरोग्यासाठी अत्यंत घातक आहे.

३. मत बनवण्याची घाई (योग्य की अयोग्य?)

सोशल मीडियावरून एखाद्या गोष्टीबद्दल मत बनवणं हे बऱ्याचदा अयोग्य ठरते. कारण:

अर्धवट माहिती: तिथे दिसणारी प्रत्येक गोष्ट सत्य नसते. अनेकदा व्हिडिओ किंवा बातम्या सोयीनुसार कापून (Edit करून) पसरवल्या जातात.

अल्गोरिदमचा खेळ: आपल्याला तेच दाखवलं जातं जे आपल्याला आवडतं, ज्यामुळे आपण एकांगी विचार करू लागतो. निष्कर्षावर पोहोचण्यापूर्वी सत्याची पडताळणी करणे आवश्यक आहे.

४. सोशल मीडियाचे फायदे आणि तोटे

कोणतीही माहिती जगाच्या कोपऱ्यातील बातम्या क्षणात मिळतात. अफवा आणि 'फेक न्यूज'चे प्रमाण जास्त.

व्यवसाय घरबसल्या वस्तूंची विक्री आणि जाहिरात करता येते. सायबर क्राईम आणि आर्थिक फसवणुकीची भीती.

संपर्क -जुन्या मित्र-मैत्रिणींना शोधणे सोपे झाले आहे. प्रत्यक्ष भेटीगाठी कमी झाल्या, एकाकीपणा वाढला.

कला, सुप्त गुणांना व्यासपीठ मिळते. वेळेचा अतोनात अपव्यय आणि तुलना करण्याची वृत्ती.

५. वापर कितपत करावा?

सोशल मीडियाचा वापर 'वापर' म्हणूनच करावा, त्याला 'व्यसन' बनवू नये.

✻ डिजिटल डिटॉक्स: दिवसातील काही तास मोबाईलपासून पूर्णपणे दूर राहा.

✻ खाजगीपण जपा: जेवणाच्या ताटापासून ते वैयक्तिक वादापर्यंत प्रत्येक गोष्ट जगाला दाखवण्याची गरज नाही.

✻ सृजनशीलतेसाठी वापर: केवळ इतरांचे आयुष्य पाहण्यापेक्षा (डलर्ऑश्रश्रळपस), काहीतरी नवीन शिकण्यासाठी याचा वापर करा.

६. निष्कर्ष- शेवटी इतकंच सांगावसं वाटतं की, सोशल मीडिया हे एक 'चांगलं साधन' आहे, पण तो 'वाईट मालक' आहे. तंत्रज्ञान आपल्या सुखासाठी असावं, आपण तंत्रज्ञानाचे गुलाम होऊ नये. आभासी जगातील लाईक्सपेक्षा प्रत्यक्ष आयुष्यातील 'स्माईल'ला जास्त महत्त्व द्या.

''हातात मोबाईल, डोळ्यात स्वप्न आभासी,
माणूस हरवलाय आज, माणसांच्याच वस्तीत
लाईक्सच्या जगात शोधतोय आपण स्वतःची किंमत,
पण हरवून बसलोय मनाची खरी श्रीमंत!''

आज मी असा विषय मांडणार आहे की जो आपल्या खिशात आहे, आपल्या हातात आहे आणि दुर्दैवाने आता आपल्या डोक्यातही शिरला आहे.

सोशल मीडियाचे फायदे

सोशल मीडिया हे केवळ शाप नाही, तर ते एक वरदानही ठरू शकते, जर त्याचा वापर योग्य कारणासाठी केला तर:

१. संकट काळात मदतीचा हात:

✻ उदाहरण: कोरोना काळात जेव्हा रक्ताची, बेडची किंवा ऑक्सिजनची गरज होती, तेव्हा ट्विटर आणि फेसबुकवरील एका पोस्टमुळे हजारो लोकांचे प्राण वाचले. अनोळखी लोकांनी एकमेकांना केलेली ही मदत सोशल मीडियामुळेच शक्य झाली.

२. लपलेल्या कौशल्यांना व्यासपीठ:

✻ उदाहरण: खेडेगावातील एखादा मुलगा ज्याच्याकडे कलेचं सादरीकरण करायला पैसे नाहीत, तो 'रील्स' किंवा 'युट्यूब'च्या माध्यमातून आपले गाणे किंवा डान्स जगासमोर आणतो आणि रातोरात प्रसिद्ध होतो.

३. शिक्षण आणि माहितीचा खजिना:

✻ उदाहरण: आज स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारा विद्यार्थी पुण्यात न जाता आपल्या शेतात बसून युट्यूबवर जगातील सर्वोत्तम शिक्षकांचे लेक्चर्स विनामूल्य पाहू शकतो.

सोशल मीडियाचे तोटे

ज्याप्रमाणे नाण्याला दोन बाजू असतात, तसे सोशल मीडियाचे तोटे अत्यंत गंभीर आहेत:

१. मानसिक आरोग्य आणि तुलना:

✻ उदाहरण: एखादा मित्र परदेशात फिरतानाचा फोटो टाकतो, तेव्हा तो पाहणारा तरुण ''माझं आयुष्य किती भिकार आहे'' असा विचार करून नैराश्यात जातो. आपण विसरतो की, तो केवळ त्याच्या आयुष्यातील एक आनंदी 'क्षण' आहे, पूर्ण आयुष्य नाही.

२. वेळेचा अपव्यय आणि व्यसन:

✻ उदाहरण: आपण अभ्यासाला बसतो आणि 'फक्त ५ मिनिटे' म्हणून इन्स्टाग्राम उघडतो, पण 'स्क्रोल' करता करता कधी दोन तास निघून जातात, हे समजतही नाही. यामुळे आजच्या तरुणाईची एकाग्रता संपत चालली आहे.

३. अफवा आणि चुकीची माहिती:

✻ उदाहरण: व्हॉट्सॲपवर एखादा चुकीचा संदेश किंवा छेडछाड केलेला व्हिडिओ आला की लोक शहानिशा न करता तो फॉरवर्ड करतात. यामुळे अनेकदा समाजात दंगली किंवा चुकीचे गैरसमज पसरतात.

४. लाईक्ससाठी जीव धोक्यात घालणे:

✻ उदाहरण: रेल्वेच्या छतावर किंवा दरीच्या कडेला उभे राहून 'सेल्फी' घेताना झालेल्या अपघातांच्या बातम्या आपण रोज वाचतो. केवळ चार लोकांनी 'वावा' म्हणावे म्हणून स्वतःचा जीव धोक्यात घालणे हा किती मोठा मूर्खपणा आहे!

''मित्रांनो, शेवटी मला इतकेच म्हणायचे आहे की,

सोशल मीडियाचा वापर 'साधन' म्हणून करा, 'साध्य' म्हणून नको. एक 'कोट' नेहमी लक्षात ठेवा:

''सोशल मीडिया आपल्याला जगाशी जोडतो, पण कुटुंबाशी तोडतो.'' त्यामुळे, मोबाईलचा **(पान ६ वर)**

# स्वावलंबन...!

पत्नीचेअंत्यसंस्कार आणि तेराव्यानंतर सेवानिवृत्त पोस्टमन मनोहरराव हे गाव सोडून मुंबईत असलेल्या त्यांचा एकुलता एक मुलगा सुनीलच्या मोठ्या बंगल्यात रहायला म्हणून गेले. खूप समजुत घालून सुनीलने त्यांना इथे आणले होते. याआधी सुनीलने अनेकदा आईवडिलांना मुंबईत आणण्यासाठी प्रयत्न केले असले, तरी मुलगा आणि सुनेच्या आयुष्यात आपण म्हातार्यांनी कशाला ढवळाढवळ करायला जायचं?, असे सांगून मनोहररावांना त्यांच्या पत्नी शारदा बाईंनीच इतके दिवस रोखले होते. आपण आपलं अख्खं आयुष्य इथेच गावात घालवलं आणि जे काही उरलंय तेही इथेच राहून काढून घेऊया असं त्यांचं स्पष्ट



मत होतं.मनोहररावांची खूप इच्छा व्हायची की सुनीलकडे जाऊन रहावे,पण पत्नीपुढे त्यांचा नाईलाज होई.मात्र यावेळी शारदाबाई हयात नसल्याने मनोहररावांना काही आडकाठी आली नाही,आणि शिवाय बायकोच्या आठवणी मुलाच्या स्नेहापेक्षा जास्त ताकदीच्या नव्हत्या, त्यामुळे मनोहरराव मुंबईला निघून गेले.

सुनील एका मोठ्या बांधकाम कंपनीत अभियंता पदावर नौकरीला होता. त्यांने मुंबईत एक आलिशानबंगला आणि कार घेतलेली होती.

घरात शिरताच मनोहरराव जरासे थबकले. मऊशार आणि पायांना गुदगुल्या होणाऱ्या चटईवरही त्यानां पाय ठेवले जात नव्हते. त्यांना दारात थांबलेले पाहून सुनील म्हणाला - ''चला अण्णा, आत या.''

''बेटा, माझ्या मातीं-चिखलाने माखलेल्या घाणेरड्या पायांनी हा गालिचा घाण तर होणार नाही ना.''??

सुनील म्हणाला - ''अण्णा, तुम्ही त्याची काळजी करू नका. इथे या आणि ह्या सोफ्यावर बसा.''

थरथरत्या पावलांनी चालत मनोहरराव सोफ्यावर बसताच हळूच दचकून किंचाळले-

सोफ्यावर बसतांना तो मऊ-मुलायम,तलम,नरम सोफा एकदम खोल शिरला त्यामुळे मनोहरराव थोडेसे भांबावले. पण मग नंतर त्यांनी स्वतःला सावरलं.

चहा पिऊन झाल्यावर सुनील मनोहररावांना म्हणाला - ''अण्णा, चला मी तुम्हाला माझे घर दाखवतो.''

- ''हो नक्की बेटा, चल.''

''अण्णा, ही लॉबी आहे जिथे आपण चहा घेत होतो. इथे कोणताही पाहुणा आला की त्याला इथेच चहा, नाश्ता दिल्या जातो आणि गप्पा मारल्या जातात. हा इकडे डायनिंग हॉल आहे. इथेच आम्हि जेवतो. आणि, हे स्वयंपाकघर आहे अन याच्याशी जोडलेले आहे ते भांडारघर. इथे स्वयंपाक घरातील वस्तू ठेवल्या आहेत. ही पलीकडे मुलांची खोली आहे.''

- मनोहररावां म्हणाले ''म्हणजे मुले तुमच्या खोलीत,तुमच्या सोबत रहात नाहीत?''

त्यावर सुनील उत्तरला, अण्णा हे एक शहर आहे आणि शहरांमध्येही सर्वात मोठं असं मुंबई शहर आहे. इथे मुलांना जन्मापासूनच एकट्याने झोपण्याची सवय लावावी लागते. आई त्यांना वेळोवेळी दूध,नास्ता,जेवण वगैरे देतच असते आणि बाकीची कामं मात्र कामवाली बाई येऊन करते.

थोडावेळ थांबून सुनील पुढे म्हणाला, ''अण्णा, ही तुमच्या सुनेची आणि माझी बेडरूम आहे. आणि बाजूला या कोपऱ्यात गेस्ट रूम आहे. कुणी पाहुणे आले तर ते इथेच थांबतात. ही छोटी खोली पाळीव प्राण्यांसाठी आहे. भविष्यात कधी कुत्रा-मांजर इत्यादी पाळले की त्याच्यासाठी या खोलीची व्यवस्था करण्यात आली आहे.

वरच्या मजल्यावर पोहोचून सुनीलने लांब रुंद गच्चीच्या एका कोपऱ्यात बांधलेली पत्र्याचं छत असलेली खोली उघडली आणि म्हणाला - ''अण्णा, हे घराचे रद्दी-भांगार घर आहे. घरातील सर्व तुटलेल्या आणि निरुपयोगी वस्तू इथे जमा केल्या जातात.'' आणि ही खोली होळी-दिवाळीला स्वच्छ केली जाते. वर बाथरूम आणि टॉयलेट देखील आहे.''

मनोहररावांनी पाहिलं की त्याच रद्दीघरात एका फोल्डिंग बंकवर एक पलंग होता आणि त्यावर त्यांची बॅग ठेवली होती. मनोहररावांनी मागे वळून सुनीलकडे पाहिले पण

सुरेखा सुर्यवंशी

तोवर तो खाली निघून गेला होता.

खाटेवर बसून मनोहर रावांनी विचार केला की,'हे कसले घर आहे, जिथे भविष्यात पाळल्या जाणाऱ्या जनावरांची उत्तम व्यवस्था केलेली आहे पण म्हातार्या आई-वडिलांसाठी मात्र इथे जागा नाही? त्यांच्यासाठी, रद्दी खोली ही योग्य निवासस्थान मानली गेली आहे. नाही.. नाही...मी अजून तरी समर्थ आहे,मी कुणाचा आश्रित बनून रहाणार नाही. सुनीलच्या आईचा विचार खरोखरच एकदम बरोबर होता. मी इथे यायलाच नको होते.'

दुसऱ्या दिवशी सकाळी सुनील वडिलांसाठी चहा घेऊन वरच्या मजल्यावर गेला तेव्हा त्याला ती खोली रिकामी दिसली. अण्णांची बॅगही तिथे नव्हती. त्याने टॉयलेट आणि बाथरूमही पाहिले पण मनोहरराव तिथेही नव्हते. तो घाईघाईने खाली आला असता त्याला मुख्य गेट उघडे असल्याचे दिसले.....

तर तिकडे दुसरीकडे बसस्थानकावर मनोहरराव तिकीट काढून गावी परतण्यासाठी सकाळच्या गाडीत निश्चल मनाने बसले होते. त्यानीं सदऱ्याच्या खिशात हात घातला आणि पाहिलं की त्यांच्या 'गावच्या स्वतःच्या घराची' चावी खिशातच होती. त्यानि ति चावी मुठीत अगदी घट्ट आवळून धरली. चालत्या वाहनात त्यांच्या चेहऱ्याला स्पर्श करणारा थंडगार वारा त्याचा निर्णय/निश्चय अधिकाधिक दृढ करत होता..


डॉ.सौ.प्रज्ञा पुसदकर
मो.९४२३७३३६३०

**आनंदी वाटचाल**

# बुध्दींचे प्रकार

सगळ्या मनुष्याची बुद्धी जरी सारखी असली तरी प्रत्येक मनुष्याच्या सदसदविवेक बुद्धीचे निर्णय भिन्न असू शकतात ,म्हणूनच बुद्धीचे सात्विक, राजस आणि तामस असे तीन प्रकार असतात.



काय करावे आणि काय करू नये ,चांगले काय वाईट काय बंध कशाने लागतो, मोक्ष कशाने मिळतो. हे ज्या बुद्धीला बरोबर समजते ती बुद्धी सात्विक होय यालाच आपण विशुद्ध बुध्दी असेही म्हणतात .

ज्या बुद्धीला धर्म आणि अधर्म ,कार्य आणि अकार्य हे बरोबर समजत नाही ती बुद्धी राजसबुद्धी होय .जी बुद्धी अधर्मालाच धर्म समजते आणि जीला सर्व गोष्टी उलटच्या वाटतात अशी अज्ञान मुलक बुद्धी तामस होय. स्वभाव भेदा नुसार कमी जास्त ज्ञानानुसार निरनिराळी मनुष्ये सात्विक राजस आणि तामस बुद्धीची असतात. एकाच मनुष्याची बुद्धी कधी सात्विक ,कधी राजस तर कधी तामस असते .सामान्य मनुष्याची बुद्धी अज्ञानामुळे बहुदा राजस असते. परंपरागत धर्म समजुती रुढी आणि कायदे हेच काय ते बरोबर असे त्यांच्या बुद्धीला वाटते .समाधान प्रचलित असलेल्या रुढी आणि चालीरीची खरोखर चांगले आहेत की नाही याचा निर्णय त्यांच्या बुद्धीला करता येत नाही म्हणून त्या तशाच चालू राहाव्या असा निर्णय त्यांची बुद्धी देते ,याचे कारण बुद्धीचा राजसपणाच होय .ज्यांना काही समजत नाही अशा लहान मुलांना खोटे बोलणे, चोरून पदार्थ खाणे, दुसऱ्या मुलांच्या खोड्या करणे इत्यादी गोष्टी वाईट आहेत असे सहसा वाटत नाही कारण चांगले काय आणि वाईट काय याचे त्यांना ज्ञान नसते. तसेच ज्यांना लहानपणापासून शिक्षणाचा संस्कार झालेला नसतो ,वाईट सवय लागलेल्या असतात .अनिष्ट भावनांना आळा घालण्याची सवय नसते. अशा लोकांच्या बुद्धीला चोरी ,खून, दरोडे, स्त्रियांवर जुलुम इत्यादी समाज हित विघातक कृत्येही चांगलीच वाटतात याचे कारण त्यांची बुद्धी तामस असते हे होय .तामस बुद्धी चेलोक बहुदा समाज शत्रू असतात. राजस आणि तामस बुद्धी चे निर्णय सामान्यतः चुकीचे असतात हे सांगायला नकोच .कित्येक वेळी कार्यकार्याचा निर्णय करण्याकरिता आवश्यक असलेले ज्ञान मनुष्याला असते आणि वर करणी तो भावनावशही झालेला दिसत नाही. तथापी त्याच्या सदसद विवेक बुद्धीचे निर्णय मात्र निसंशय चुकीचे असतात. त्याचा प्रकार असा असतो .खोटे बोलणे ,दुसऱ्याचा पैसा लबाडीने घेणे, घातपात करणे इत्यादी कृत्ये वाईट होत असा निर्णय बहुधा कोणत्याही सामान्य मनुष्याची बुद्धी देते .पण मनुष्य कधीकधी लोभाला बळी पडून ते निर्णय झुगारून देऊन त्यांच्याविरुद्ध वागतो. बुद्धीच्या निर्णया विरुद्ध मनुष्य वागला म्हणजे ती त्याला टोचत राहते. पण असे वारंवार झाले की बुद्धी शेवटी बोथट होते. अप्रामाणिकपणे वागणे योग्य आहे असेही त्याची सदसदविवेक बुध्दी त्याला सांगू लागते .

सदसद विवेक बुद्धीचे निर्णय अचूक असावे अशी इच्छा असल्यास ते कधीही बोथट होऊ देता कामा नये. लहानपणापासून सदसदविवेक बुद्धीच्या निर्णयानुसार वागण्याची सवय केल्यास सदसद विवेक बुद्धी कधीही बोचाट होऊ शकत नाही आणि तिचे निर्णय मनुष्याच्या ज्ञानानुसार तात्कालीन परिस्थितीत शक्य तितके अचूक असतात .ज्यांना विचार करण्याची शक्ती ,सवड किंवा इच्छा नसेल ते कोणावर तरी विश्वास ठेवून त्यांच्या आज्ञेनुसार वागतात .त्यांच्यासमोर विचारांचा कलह सहसा निर्माण होत नाही. पण जे स्वतंत्रपणे विचार करू शकतात आणि विचार करतात त्यांच्यासमोर विचारांचे कलह वारंवार उत्पन्न होतात .त्यावेळी त्यांच्या सदसद विवेक बुद्धीला समोरच्या प्रश्नाचा निर्णय करावा लागतो .अशावेळी शास्त्रानुसार वागणे योग्य असते .शास्त्र शब्दाचा मूळ अर्थ पद्धतशीर ज्ञान असा आहे .याचाच अर्थ स्वतःची सात्विक बुद्धी जसे सांगेल तसेच वागणे हेच शास्त्रानुसार वागणे होय. जो सदैव आपल्या सात्विक सदसदविवेक बुद्धीच्या निर्णयानुसार वाटतो त्यालाच महात्मा असे म्हणण्यात येते. मात्र कोणत्याही प्रश्नाचा निर्णय करतेवेळी त्या प्रश्ना संबंधाने शक्य तितके सांगोपांग आणि पूर्ण ज्ञान करून घेतलेले असले पाहिजे. बुद्धीवर कोणत्याही अनिष्ट भावनांचा पगडा बसलेला असता कामा नये आणि बुद्धी शक्य तितकी पक्व आणि स्थिर असली पाहिजे म्हणजे झाले. अपक्व अस्थिर आणि चंचल बुद्धीच्या अज्ञानी मनुष्यानी मात्र आपल्या सदसदविवेक बुद्धीच्या निर्णयावर अवलंबून न राहता योग्य मार्गदर्शकाची मदत घेणे श्रेयस्कर आहे प्रत्येक मनुष्य स्वतःच्या विवेक बुद्धीच्या निर्णयानुसार वागतो की नाही नसल्यास का वागत नाही तो कोणाच्या आज्ञेनुसार वागतो हे प्रश्न महत्त्वाचे असून त्यांची उत्तरे देता येण्याकरिता आपल्याला संकल्प शक्तीच्या म्हणजे आत्म्याच्या व्यापारांची माहिती असणे आवश्यक आहे.


डॉ.यशवंत सुरोशे
मो.८३८०८६२२१२

**उमलत्या कळ्या**

# तंत्रस्नेही

स्वरूपा आपला गृहपाठ करत बसली होती. स्वयंपाक घरात तिची आई वरणासाठी लसूण सोलत होती. जीवशास्त्राचा गृहपाठ करताना स्वरूपाला काही समस्या आल्या होत्या. मोबाईल हातात असता तर लगेच मनातली शंका दूर करता आली असती नि गृहपाठ पूर्ण करता आला असता, असा ती विचार करत होती. मात्र तिचे बाबा अजूनही शेतावरून परतले नव्हते. घरात फक्त त्यांच्याकडेच स्मार्टफोन होता. स्वरूपाला लागेल तेव्हा ते आपला स्मार्टफोन देत. तेव्हा स्वरूपा कितीतरी नव-नवीन गोष्टी आपल्या आई-बाबांना त्या मोबाईलमध्ये दाखवी. नव-नवीन अॅप कसे घ्यायचे, त्यांचा वापर कसा करायचा, हे ती सांगायची. मात्र तिची आई तिला यावरून रागवत असे.

आधी शाळेतला अभ्यास कर. शिकून नोकरी धर, पगार कमव. मग तुला हवा तसा मोबाईल वापर बाई! असं तिची आई म्हणायची.

स्वरूपाला राग यायचा. पण तिला मोबाईलही हवाहवासा वाटे. तरी तिने तिच्या मनावर ताबा मिळवला होता. संध्याकाळी फारतर अर्धा-पाऊण तास ती मोबाईल वापरत असे. मग जेवण झाल्यावर ती आपल्या आई-बाबांसोबत गप्पा मारताना मोबाईलमधल्या नवनव्या गोष्टी सांगायची.

प्रकाश संश्लेषणाची प्रक्रिया कशी होते, याचा व्हिडीओ तिला बघायचा होता म्हणून तिने उरलेला अभ्यास पूर्ण करण्याचे ठरवले. तेवढ्यात तिचे बाबा खांद्यावरील टॉवेलने अंग पुसत घरात आले. बाबांना पाहून स्वरूपाने आईला आवाज दिला.

आई, बाबा आले घरी.

हो का? त्यांना म्हणावं पाणी काढते आंघोळीला. थांबा तोवर. लगेच चहाही करते म्हणावं.

अर्थात हे सगळं बोलणं बाबाच्या कानावर थेट पडतच होते.

तिच्या बाबांनी खिशातला मोबाईल स्वरूपाच्या हातात दिला नि ते स्वयंपाकघरात गेले.

अगं, वांग्यांच्या बुडांवर कसला तरी रोग पडलेला दिसतोय.

अहो! सततच्या पावसामुळे बुरशी बसली असेल रोपांवर!

मी बघितलं नीट. मात्र बुरशीसारखाच रोग दिसतोय रोपांवर! मी त्याचा फोटोही काढून आणलाय.

आई-बाबांचं बोलणं स्वरूपा ऐकत होती. बाबांच्या बोलण्यात एक प्रकारची चिंता तिला जाणवत होती. यंदा तिच्या बाबांनी विहिरीचं काम करून तिची खोली वाढवली होती. विहिरीच्या पाण्यावर त्यांनी भाजीपाला लावण्याचे आधीच ठरवले होते. जून महिन्यात दोन हजार वांग्यांची रोपे लावली होती. मात्र पावसाच्या अधिक प्रमाणामुळे वांग्यांच्या रोपांची वाढ खुंटली आहे, असे तिचे बाबा दोन दिवसांपूर्वीच म्हणाले होते. आज मात्र त्यांना रोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे दिसले होते.

स्वरूपाने मोबाईलमधील गॅलरीत जाऊन तिच्या बाबांनी रोपांचे काढलेले फोटो पाहिले. तिने फोटो झूम करून पाहिले तर तिलाही बाबांचे बोलणे समजले. रोपांची पाने थोडी सुकलेली दिसत होती. रोपाच्या खोडाला, त्याच्या खालील बाजूस पांढरी पावडर लागल्यासारखे दिसत होते. काही रोपांची पाने गुंडाळल्यासारखी दिसत होती. तिच्या बाबांनी मळ्याचे बरेच फोटो काढले होते. फोटो पाहता-पाहता स्वरूपाला 'एआय' तंत्रज्ञानाची आठवण झाली. तिने अगोदरच मोबाईलमध्ये चॅटजीपीटी व गुगल जेमिनी एआय सारखे अॅप्स घेतले होते. या अॅपवर तिने आपल्या मळ्यातील वांग्यांच्या रोपांची चित्रे टाकली नि स्पष्ट शब्दात प्रश्न टाईप केला.

या रोपांना कोणत्या रोगाची लागण झाली आहे? त्यावर कोणता औषधोपचार करावा?

काही सेकंदात रोगाचे नाव स्क्रीनवर झळकले. स्वरूपाला आश्चर्य वाटले. ती जागेवरून उठली नि स्वयंपाकघरात घरात वेगाने आली.



बाबा, हे बघा! हा रोग पडला आहे आपल्या रोपांवर!

दाखव!

थांबा मी त्यावरील उपाय विचारते.

त्यापूर्वीच एआयने विचारले

ही वांग्याची रोपे आहेत का?

'हो' असे उत्तर टाईप केल्यावर लगेच पुढचा प्रश्न स्क्रीनवर झळकला.

या रोपांची लागवड महिन्याभरापूर्वी केली आहे काय?

स्वरूपाने लगेच 'हो' असा शब्द टाईप केला.

मग आणखी तीन-चार प्रश्न विचारले. मातीचा रंग कोणता, रोपांमधील अंतर किती असे ते प्रश्न होते.

स्वरूपाची आईही मोठ्या कुतूहलाने मोबाईलमध्ये बघू लागली.

बाबा, हे बघा यावर हे औषध सुचवले आहे. दहा लिटर पाण्यामध्ये वीस मिली हे औषध मिसळून फवारणी करायची असे सांगितले आहे.

जग किती पुढे गेलंय ना! आपल्याला तर यातलं काहीच माहित झालं नसतं. बरं झालं तू तरी शिकून घेतलंयस. आई कौतुकानं बोलत होती.

अगं आई! हे एकदम सोपं आहे. आपण फक्त आपली अडचण व्यवस्थित आणि नीटपणे विचारली की आपल्याला योग्य ती माहिती पुरवली जाते. मी बाबांना अॅप कसं वापरायचं हे शिकवते आता.

नक्की शिकव मला. तुझ्या आईलाही दाखव हे सगळं. आधी मी आंघोळ करून येतो. मग चहा घेता-घेता तू हे आम्हाला शिकव.

स्वरूपाला केवढा आनंद झाला. नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग आपल्या शेतकरी आई-बाबांना होतोय, याचा आनंद तर होताच शिवाय आपण नव्या तंत्रज्ञानाचा सहज आणि अचूक वापर केला याचाही भाग होता.

तिला आठवत होतं की तंत्रज्ञानाच्या तासिकेला कदम सर सांगत होते की हल्ली माहिती मिळवणे सहजसोपे होणार आहे. मात्र मिळालेल्या माहितीवरून योग्य निर्णय घेण्यासाठी आपण अधिक तयार असले पाहिजे. मिळालेल्या माहितीचा सरसकट वापर केला तर काय परिणाम होतील, याबाबत स्वरूपा विचार करत राहिली.

मग तिने बाबांना एआयचा वापर कसा करावा हे समजावून सांगितले. मिळालेल्या माहितीमध्ये आपले स्वतःचे अनुभवही जोडले पाहिजेत असं स्वरूपा म्हणाली. तेव्हा तिची आई म्हणाली,

अगं आपले अनुभव आपण कसे काय जोडणार?

अगं, तिला असं म्हणायचंय की समजा तू कोथिंबीर वड्यांची रेसिपी मोबाईलवर बघितली तरी प्रत्यक्ष वड्या बनवताना तिखट, मीठ किती घ्यायचे याबाबत तू घरातल्यांचा विचार करशील व तू तुझ्या अनुभवाप्रमाणे तिखट, मीठाचे प्रमाण ठरवशील असे आहे ते.''

बाबा, एकदम बरोबर बोललात तुम्ही! स्वरूपा तिच्या बाबांकडे बघतम्हणाली.

अगं! औषधाची किंमत किती आहे ते बघ नि कोणत्या दुकानात मिळेल याचीही चौकशी कर.

या बाबा !आपण दोघे सोबतच ही माहिती मिळवू.

मग स्वरूपा पटापट टाइप करू लागली.

अगं हे मला टाइप करायला कठीण जातं. कंटाळा येतो. तिचे बाबा म्हणाले.

बाबा, इथे माईक दाखवलाय बघा. यात योग्य आवाजात आणि स्पष्ट बोलले तरी आपल्याला हवी ती माहिती मिळते.

खरंच? हो बाबा,

आता तुम्ही, 'या औषधाची किंमत किती आहे?' असे बोला बरं.

दोघा बापलेकीचं काम सुरू होतं. स्वरूपाच्या आईला आपल्या मुलीचं केवढं कौतुक वाटत होतं. स्वयंपाक घरातून ती बापलेकीच्या बोलण्याचा कानोसा घेत राहिली. आपणही नव्या जगाच्या चार नव्या गोष्टी शिकाव्यात, असे तिला वाटू लागले.



# म्हणींच्या गोष्टी

वैशाली गोडबोले
मनमाड, मो.९४२०६ ९०१६५

जन्मभर अडीअडचणीतून मार्ग काढत आयुष्य वार्धक्याच्या टप्प्यावर येऊन पोचतं, वाटतं प्रवास संपत आलाय आणि अशा वेळी नातवंडाच्या रूपानं एक चिमुकलं स्वप्न हळूच ओंजळीत येतं आणि मग वाटतं हे लोभस वाणं सुख अनुभवण्यासाठी अजून खस्ता खाव्या लागल्या तरी चालेल आणि मग वार्धक्यही लोभस वाटतं, असं असतं आजी आणि नातवाचं नातं, दुधावरची साय, आपल्या जवळचं सगळं देण्याचा शिकवण्याचा ती अट्टाहास करते, सकाळी उठल्यापासून मग सुरू होते आधी केले मग सांगितले या नियमाने ती श्लोक म्हणते ''कराग्रे वसते लक्ष्मि करमध्ये सरस्वती करमुले तु गोविंदम प्रभाते कर दर्शनम्'', ''समुद्र वसने देवि पर्वतस्तन मंडले, विष्णु पत्नी नमस्तुभ्यं, पादस्पर्शम् क्षमस्वमे'' नातु अनुकरण करतो, नाहीतर लोका सांगे ब्रम्हज्ञान, आपण कोरडे पाषाण.. शाळेतून आल्यावर तो शाळेतल्या गमती जमती सांगतो, पण मुद्दा बाजुलाच राहतो आणि नमनालाच घडाभर तेल असा प्रकार होतो.

मी मोत्याच्या वस्तु बनवते, तोरण, महिरप इ. यालाही आवडते करायला, तोही मागतो वायर, मणी, मग आता बास चल बंद करू या असं म्हणलं की तो म्हणतो आता एकच हं, आता एकच हं, मग मी त्याला म्हणते आशा सुटेना अन् देव भेटेना

मोबाईल ही एक आता घरोघरी डोकेदुखी झाली आहे, मोबाईल घ्यायचा आणि गेम खेळत बसायचं, पकडलं गेलं की म्हणायचं होमवर्क बघत होतो आणि मग तू असं कर ते बघ थोडक्यात क्रॉस चेक कर असं म्हणायचं असतं मी त्याला म्हणते चोराच्या मनात चांदणं..अभ्यासाला बसल्यावर दोघांना वेगळं वेगळं असून एकमेकांचे घेण्यात काय आनंद असतो काय जाणे? आणि मग छान अभ्यास चालू असताना एकदमच भांडण सुरू होतं अन् हरिदासाची कथा मुळपदावर येते, मग गाढवापुढे वाचली गीता कालचा गोंधळ बरा होता असं म्हणावं वाटतं, जेव्हा दोघांचे एकमत असतं तेव्हा गुण्यागोविंदाने चाललं असतं, मग आठवते ती उंदराला मांजर साक्षी ही म्हण. जेवायला चल, जेवायला चल आवाज दिला तरी टी. व्ही. पुढून हलत नाहीत मग विचारायचं येईल माझा हरी अन् देईल बाजल्यावरी (टी.व्ही. समोरी) असं होणार आहे का? म्हणून पुढं घालून आणावं लागतं, दुपारी दूध प्यायलं की लगेच ताकत आली का म्हणून दंड दाखवतो, तेव्हा सांगावं लागतं असं लगेच पी हळद अन् हो गोरी असं होत नाही, संध्याकाळी व्यायाम म्हणून सायकल चालवायची, काही वेळा इतर मित्रांच्या संगतीने ते जास्तच होतं, मग थकवा वाटतो, पाय दुखतात आणि अति तेथे माती ची प्रचिती येते.

मोठी माणसं बोलायला लागली की मध्ये तोंड खुपसलं नाही तर ती मुलं कसली? मग म्हणावं लागतं घेणं न देणं उगीच दिवसा कंदिल लाऊन बघणं मुलं इंग्लिश मिडीयम ची त्यामुळे म्हणी असं कळत नाही, लहान नातु तर पाच वर्षांचा आहे, तो म्हणतो तुझे शब्द म्हण ना आजी. लिंबूपाणी पिताना एकच नातु समोर असतो, त्याला सरबत बनवून द्यायचं, दुसरा आल्यावर विचारतो मला नाही ना! हाजिर तो वजीर असं सांगावं लागतं. आजीच्या प्रत्येक गोष्टीत लुडबूड करायची असते, रांगोळी, विणकाम, माझ्यासारखं त्याचं होत नाही, नाचता येईना अंगण वाकडे काही वेळा काकडीची साल मी काढतो, भाजी मी पण निवडतो, ओट्यावर उभं करून घालायला द्यायचं पण काही गोष्टी जपाव्या लागतात, मग आठवते ती भटाला दिली ओसरी, भट हळूहळु पाय पसरी ही म्हण. एखादेवेळी फोन लागत नाही, समोरही कुणी नसतं, मग निरोप द्यायचा म्हणून शेजारी पाठवायचे, इतकं पढवून, बजावून वेगळाच निरोप सांगून येतो, नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे.. पूर्वीची छडी लागे छमछम, विद्या येई घमघम ही म्हण तर सांगितली तर मुलं म्हणाली असं मारलं तर टीचर लाच पनिशमेंट करतात, कप्पाळ! गृहपाठ झाला की ओरडुन सांगायचं खाली खेळायला पळायचं असतं ना, मग मी सांगते विद्या विनयेन शोभते.. पर्वा गणपतीत वेगवेगळ्या स्पर्धा असायच्या मोठ्यांसाठी, मग नातु बेस्टलक देणार आणि पटपट लिही आजी बक्षिस मिळालं पाहिजे बरं का आजी, मी म्हणलं गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाहीतर मोडून खाल्ली मुलांकडे आता भरपूर खेळ असतात, सगळं अगणितच, गाड्या, मेकॅनो, **(पान ६ वर)**



# दृष्टिकोन

जयश्री बिर्ला, अमळनेर

नजर बदलली की नजारे बदलतात,
विचार बदलले की किनारे बदलतात
नशिबाला दोष देणारे थकून जातात,
दृष्टिकोन बदलणारे सारे जग बदलतात.

दृष्टिकोन म्हणजे आयुष्य बदलणारी खरीदृष्टी. आपला दृष्टिकोन सभोवतालची परिस्थिती, संस्कार, वाचन आणि अनुभवांमधून मोजला जातो. कोणत्याही घटनेकडे, व्यक्तीकडे किंवा परिस्थितीकडे बघण्याचा मानसिक मार्ग म्हणजे दृष्टिकोन होय. दृष्टिकोन म्हणजे फक्त डोळ्यांनी दिसणारे दृश्य नव्हे, तर मनाने केलेले आकलन. एका पावसात कोणाला चिखल दिसतो, तर कोणाला इंद्रधनुष्य, एकाच फुलात कोणाला सुगंध जाणवतो तर कोणाला काटे दिसतात. फरक हा निसर्गात नव्हे , तर मनाच्या दृष्टिकोनात असतो.

दृष्टी बदलली की दिशा बदलते दिशा बदलली की भविष्य बदलते.

एखाद्या गोष्टीबद्दल, घटनेबद्दल, प्रसंगाबद्दल , व्यक्ति बद्दल, तसेच कामाबद्दल आपला जो काही दृष्टिकोन ठरवायचा आहे , तो पूर्वग्रहांना बाजूला ठेवून आपण स्वअनुभवातून ठरवणे फार गरजेचे आहे. जसे काचेच्या अर्ध्या भरलेल्या ग्लासाकडे पाहताना एकाला तो अर्धा रिकामा दिसतो , तर दुसऱ्याला अर्धा भरलेला. वस्तू तीच असते , पण विचार वेगळे असतात. ह्यालाच दृष्टिकोनाची ताकद म्हणतात.

जीवनात सुख-दुःख , यश अप-यश, लाभ-हानी हे सतत येत असतात. या गोष्टी टाळता येत नाही. पण त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टी आपण नक्की बदलू शकतो. जेव्हा आपण प्रत्येक अनुभवातून काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करतो , तेव्हा अधिक समृद्ध आणि अर्थपूर्ण बनतो. सकारात्मक दृष्टिकोन माणसाला आत्मविश्वास देतो . तो निराशेच्या क्षणी आशेचा किरण दाखवतो आणि अपयशानंतर पुन्हा उभे राहण्याचे बळ देतो. जीवनात अनेक संकटे येतात. ती आपल्याला मोडण्यासाठी नसतात तर घडवण्यासाठी येतात. लोखंड तापल्याशिवाय तलवार होत नाही आणि माणूस संघर्षाशिवाय महान होत नाही. हे ज्याला समजते त्याचा दृष्टिकोन कधीच नकारात्मक रहात नाही.दृष्टिकोन हा माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वात महत्त्वाचा अलंकार आहे.

जीवनाचे खरे सौंदर्य बाह्य परिस्थितीत नसते, तर आपण त्या परिस्थिती कडे कोणत्या नजरेने पहात त्यात असते. म्हणून प्रत्येक दिवस सकारात्मकतेने, आशेने आणि विश्वासाने पहावा. योग्य दृष्टीकोन हा केवळ यशाचा मार्ग नसून, आनंदी आणि समाधानी जीवनाचा खरा पाया आहे .

आकाश तेच तारे तेच चंद्रही तोच असतो
बदलतो तो फक्त मनाचा दृष्टिकोन असतो.
ज्याने स्वतःची नजर उजळून घेतली,
त्यासाठी प्रत्येक दिवस नवा उत्सव असतो!!!

# राष्ट्रीय आंदोलनात खानदेशातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान



प्रा.डॉ.संजय ढोडरे
मो.९८२२५३३६४२

माझा खान्देश



भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही ऐतिहासिक घटनांची एक मालिका होती, ज्याचा अंतिम उद्देश भारतातील ब्रिटिश राजवट संपवणे हा होता. हा स्वातंत्र्य लढा १८५७ ते १९४७ या काळात तब्बल ९० वर्ष चालला. या लढ्यातून जगाच्या पाठीवरील अनेक राष्ट्रांनी प्रेरणा घेत स्वातंत्र्याची लढाई लढली. स्वातंत्र्याचा हा लढा विश्व क्रांतीचा , शांतीचा व अहिंसेचा लढा होता. संपूर्ण देशभर लढला गेलेल्या या स्वातंत्र्य लढ्यात पश्चिम खानदेशातील विशेष करून सातपुडा पंचक्रोशीतील आदिवासी समाजातील अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी सहभाग घेतला होता. ज्यांच्यावर फारसे लिहिले गेले नाही. स्वातंत्र्य चळवळीसाठी प्रत्यक्ष- प्रत्यक्षपणे योगदान देणाऱ्या ज्ञात-अज्ञात अशा स्वातंत्र्य सैनिकांच्या समर्पित जीवनावर प्रकाश टाकण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे.

**स्वातंत्र्य सैनिक जनार्दन पोहऱ्या वळवी**

स्वातंत्र्य सैनिक जनार्दन पोहऱ्या वळवी यांचा जन्म १६ जानेवारी १९२४ रोजी पश्चिम खानदेशातील मुंदलवड, तालुका धडगांव या गावात सातपुड्यातील एका आदिवासी गरीब कुटुंबात झाला. सातपुड्यातील ख्रिश्चन बहल मुंदलवड या गावात सुरुवातीपासूनच मिशनऱ्यांनी शाळा व दवाखाना सुरु केला होता .अज्ञान,अंधकार व अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणावर असलेल्या या गावात शिक्षणाची आवड सुरुवातीपासूनच नसलेल्या सातपुड्यातील आदिवासी समाजात मुलांनी शाळेत जावे, शिकावे याची जाणिव गावातील लोकांना नव्हती. परंतु जनार्दन महाराज यांचे वडील याला अपवाद ठरले. इतरांचा विरोध असतांना देखील वडिलांनी जनार्दनला महाराजांना शाळेत घातले. गावातील मिशनऱ्यांपासुन प्रेरणा घेऊन जनार्दन महाराज पुढे स्वयंप्रेरणेने शिक्षण घेतले .घरात अठरा विश्व दारिद्र्य त्यामुळे त्यांचे बालपण व विद्यार्थी जीवन फार हलाखीचे गेले. प्राथमिक शिक्षण जन्म घ्यावी मुंदलवड नंतर पुढील शिक्षण तळोदा या ठिकाणी झाले. तळोदा गुजरातलगत असल्याने त्या ठिकाणी स्वातंत्र्य चळवळीतील अनेक थोर मोठ्या नेत्यांच्या सभा त्या ठिकाणी होत असत. महात्मा गांधींच्या नेतृत्वातील स्वातंत्र्य चळवळीची धग गुजरात-महाराष्ट्र-मुंबई- पुणे वरून सातपुड्याच्या दऱ्या खोऱ्यापर्यंत येऊन पोहोचली होती. १९४२ चा तो काळ होता.जनार्दन महाराज त्यावेळी तळोदा येथे इयत्ता सातवीत शिकत होते . कोवळ्या वयात जनार्दन महाराज यांनी सहपाठी विद्यार्थ्यांबरोबर १९४२ च्या चलेजाव चळवळीत भाग घेतला. स्वातंत्र्यलढ्याचे महत्त्व तरुणांच्या मनावर बिंबवले गेले. हजारो विद्यार्थी शिक्षण सोडून ब्रिटिश सरकारच्या अन्याय अत्याचाराचा कडाडून विरोध करू लागले. ब्रिटिश सरकारचा निषेध सभा होत.मूळचे गुजरात प्रांतातील असलेले नानासाहेब ठकार, बाळूभाई मेहता यांच्या विचारांनी प्रभावित होऊन जनार्दन महाराज या स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय झाले. गुप्त बैठकांमध्ये सहभाग घेऊ लागले.त्यामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊन सातवीच्या परीक्षेत नापास झाले, एक वर्षानंतर पुन्हा तळोदा येथे बोर्डींगमध्ये प्रवेश मिळवुन सातवी फायनलची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर नरसी पाडवी व पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळाचे अध्यक्ष नानासाहेब ठकार यांचे मार्गदर्शन व मदतीमुळे त्यांनी शेतकी शाळेचे शिक्षण पूर्ण केले . शेतकी शाळेचे शिक्षण पूर्ण झाल्याबरोबर १९४५ मध्ये 'फिल्ड कामगार' म्हणून नोकरीची संधी चालून आली असता नोकरी न करता संपूर्ण जीवन आदिवासी समाजाच्या कल्याणासाठी समर्पित करण्याचा संकल्प त्यांनी केला.दरम्यान तळोदा परिसरातील मोरवड (रंजनपुर ) येथील आप श्री गुलाम महाराज यांच्या विचारांनी प्रभावीत होऊन त्यांच्या आरती कार्यक्रमात सहभागी होत राहिले. आरती कार्यक्रम हा गुलाम महाराजांनी त्यावेळी आदिवासी समाजाच्या आत्मसन्मानासाठी उभी केलेली एक मोठी समाजप्रबोधनाची चळवळ होती.

स्वातंत्र्यानंतरच्या १९५२ व १९६२ अशा दोन निवडणुकांमध्ये विधानसभा सदस्य , पश्चिम भिल्ल सेवा मंडळ ,धुळे जिल्हा लोकल बोर्ड अशा विविध भूमिकेतून त्यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य केले पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळाच्या 'युग संदेश' साप्ताहिकाचे काम सांभाळून त्यांनी आदिवासींच्या प्रश्नांना वाचा फोडली. संपूर्ण सातपुडा पंचक्रोशीतील आदिवासी समाजात ते त्यांच्यातल्या सात्विक वृत्तीमुळे 'जनार्दन महाराज' या टोपण नावाने ओळखले जाऊ लागले.पुढे त्यांनी १९५७ मध्ये सक्रीय राजकारणाचा त्याग करून शिक्षण क्षेत्रात कार्य करण्यास सुरुवात केली. त्यावेळचे धुळे जिल्ह्याचे खासदार जयवंतराव नटावदकर हे पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळाचे अध्यक्ष होते. त्यांच्यासोबत जनार्दन महाराज यांनी आदिवासी विकासाचा संकल्प करून प्रत्येक तालुक्यात आश्रम शाळा, माध्यमिक विद्यालये, छात्रालये सुरु केली. जनार्दन महाराजांवर नानासाहेब ठकार यांच्या विचारांचा प्रभाव सुरुवातीपासूनच होता. नानासाहेब ठकार यांच्या धडगाव येथील सभेतील भाषणाने प्रभावित होऊन त्यांनी सामाजिक कार्य करण्याचा करण्याचा संकल्प केला. सातपुड्यातील आदिवासी समाजाचे कल्याण व सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाशिवाय दुसरा मार्ग नाही. आदिवासींना माणूस म्हणून जगण्याची शक्ती मिळावी ,त्यांना उत्तम असे शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी १९६३ मध्ये आदिवासी सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ या शिक्षण संस्थेची स्थापना करून डोंगर दऱ्या-खोऱ्यातील अज्ञान व अंधकार असलेल्या आदिवासी मुलांसाठी संस्थेच्या विविध विद्याशाखा सुरू केल्या. सातपुड्यातील खडक दऱ्यामध्ये शिक्षणाचा प्रवाह मोठ्या कष्टाने आणणारे जनार्दन महाराज आयुष्यभर कौलरु छपरात चार कुडांमध्ये जीवन जगले. आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांनी खादीचे कपडे वापरले. 'साधी राहणीमान व उच्च विचारसरणी' असलेले जनार्दन महाराज सातपुडा दऱ्याखोऱ्यातील आदिवासींचे 'मसीहा' होते.त्यांचे संपूर्ण जीवन आदर्शवत राहिले. त्यांनी शिक्षा क्षेत्रात आणलेल्या क्रांतीमुळे सातपुडा पर्वतीय क्षेत्राचे नाव राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले. सातपुड्यातल्या तीन दांड्यांच्या झोपडीच्या मैदानात त्यांनी लावलेली शिक्षण वेल पसरत जाऊन आज अखंड शिक्षणाची गंगा त्यातून खळखळ वाहताना दिसत आहे. आश्रम शाळा, वस्तीगृहे ,विद्यालय, उच्च शिक्षण देणारे महाविद्यालय सुरू करून त्यांनी सातपुड्यातील आदिवासी व बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची गंगा वाहती ठेवली. त्यांच्या शैक्षणिक सामाजिक राजकीय योगदानाची दखल घेत महाराष्ट्र शासनाने १५ ऑगस्ट १९७१ रोजी त्यांना 'दलित मित्र' अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेने २००३ मध्ये'वीर बिरसा मुंडा' पुरस्कार देऊन सन्मानित केले. निस्वार्थपणे आदिवासींच्या कल्याणाकरिता आपले आयुष्य समर्पित करणाऱ्या जनार्दन महाराज यांचे १६ ऑगस्ट २०१२ रोजी निधन झाले.

माझे बालपण व महाविद्यालयीन जीवन ज्या गावात गेले, त्या सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या म्हसावद पासून साधारणतः पाच-सहा किलोमीटर अंतरावरील रामपूर येथे जनार्दन महाराज यांच्या निवासस्थानी ३४-३५ वर्षापूर्वी तीन-चार वेळा प्रत्यक्ष भेटण्याचा योग आला होता. त्यावेळेस मी विद्यार्थीदशेत होतो. जीवन किती साधं असावं...आणि ते कसं जगावं.. याचे मूर्तिमंत उदाहरण व आदर्श रुप 'महाराज' यांच्या व्यक्तिमत्वात त्यावेळी दिसले. त्यांची ती 'आदर्श प्रतिमा' आजही चक्षुसमोर साक्षात उभी राहते. सातपुड्यात शिक्षणाची क्रांती आणणाऱ्या या स्वातंत्र्य सैनिकाच्या जीवनावर आधारित महाविद्यालयीन जीवनातील माझे मित्र असलेले नंदुरबार लोकमत आवृत्तीचे संपादक रमाकांत पाटील (म्हसावद) यांनी 'सातपुड्याचा कर्मयोगी' तसेच ज्येष्ठ पत्रकार बाबुलाल नाईक (शहादा) यांनी 'दरीतील कर्मयोगी' हे कथारूप ग्रंथ लिहून जनार्दन महाराज यांच्या संघर्षमय जीवनाची कहाणी मांडली आहे. खऱ्या अर्थाने सात्विक जीवन जगलेल्या सर्वसामान्यांचे 'महाराज' यांचे जीवन व कार्य आजच्या व येणाऱ्या पिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे.

---

# हिंदू अविभक्त कुटुंब (HUF) म्हणजे काय? व त्याची आयकर गणना



सीए नरेंद्र नेरपगार
मो.९६७३७३०८९५

अर्थवेध

पूर्वीपासूनच भारतात एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात आहे. एकत्र कुटुंब पद्धतीत व्यवसाय सुद्धा केला जात असतो किंवा कुटुंबाच्या नावाने स्थावर मालमत्ता किंवा गुंतवणूक देखील असते. त्या व्यवसाय, मालमत्ता किंवा गुंतवणुकीतून येणारे उत्पन्न हे कुटुंबातील कोणत्या एका सदस्याचे किंवा व्यक्तीचे नसते तर ते संपूर्ण कुटुंबाचे असते. त्यामुळे असे उत्पन्न एका व्यक्तीच्या उत्पन्नात गृहीत धरून त्यावर आयकर लावणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे आयकर कायद्याने





१९२२ पासून ब्रिटिश कॉलोनीयल नियमांतर्गत हिंदू अविभक्त कुटुंबाला वेगळा करदात्याचा दर्जा दिला. त्यानंतर आयकर कायदा १९६१ मध्ये देखील हिंदू अविभक्त कुटुंबाला स्वतंत्र अस्तित्व देण्यात आले आहे. त्यानुसार हिंदू अविभक्त कुटुंबाने मिळवलेले उत्पन्न हे हिंदू अविभक्त कुटुंबाच्या उत्पन्नातच करगणना करण्यासाठी ग्राह्य धरले जाईल. त्याला कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या उत्पन्नात ग्राह्य धरले जाणार नाही व कुटुंबातील सदस्याच्या वैयक्तिक करगणनेवर त्याचा परिणाम होणार नाही.

आयकर कायदा २०२५ नुसार आयकर लावताना करदात्यांचे विभाजन हे सात स्वरूपात केले जाते ते म्हणजे वैयक्तिक करदाता, भागीदारी संस्था, कंपनी, व्यक्तींचा समूह किंवा गट किंवा ट्रस्ट, हिंदू अविभक्त कुटुंब, कृत्रिम न्याय संस्था आणि स्थानिक प्रशासन वरील गटात हिंदू अविभक्त कुटुंबाला वेगळ्या करदात्याचा दर्जा देण्यात आलेला आहे. त्याला वैयक्तिक सदस्यांव्यतिरिक्त एक वेगळा करदाता मानला जातो. त्यामुळे हिंदू अविभक्त कुटुंबाच्या नावाने वेगळे पॅन कार्ड असते. व बँक अकाउंट देखील वेगळे असते. आयकर कायद्याची मूलभूत सूट मर्यादा हिंदू अविभक्त कुटुंबाला देखील वेगळी असते. म्हणजेच जसे व्यक्तीला ४ लाखापर्यंत उत्पन्नावर आयकर लावला जात नाही त्याचप्रमाणे हिंदू अविभक्त कुटुंबाला देखील ४ लाखापर्यंत उत्पन्नावर आयकर लावला जात नाही इतर वजावटी ज्या काही वैयक्तिक करदात्याला मिळतात त्या सर्व हिंदू अविभक्त कुटुंबाला देखील मिळत असतात. हिंदू अविभक्त कुटुंबाच्या मुख्य व्यक्तीला कर्ता असे म्हटले जाते साधारणता कुटुंबातील जेष्ठ पुरुष हा हिंदू अविभक्त कुटुंबाचा कर्ता असतो. तो या हिंदू अविभक्त कुटुंबाचा मुख्य मानला जातो परंतु हिंदू अविभक्त कुटुंबातील इतर सदस्यांना देखील सर्व अधिकार असतात. जेव्हा वडिलांचा दुर्दैवाने मृत्यू होतो आणि तिला भाऊ नसतो तेव्हा स्त्री देखील कर्ता असू शकते. त्या स्थितीत मुलगी किंवा आई कर्ता असू शकते.

हिंदू अविभक्त कुटुंब (HUF) स्थापन करण्यासाठी आवश्यक अटी व महत्त्वाच्या बाबी–

हिंदू अविभक्त कुटुंब (HUF) तयार करण्यासाठी सर्व कुटुंब लागत असते एक व्यक्ती हिंदू अविभक्त कुटुंब तयार करू शकत नाही.

विवाह झाल्यावर ते कुटुंब हिंदू अविभक्त कुटुंब (HUF) तयार करण्यास पात्र होते शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर हिंदू अविभक्त कुटुंब (deed) डीड तयार करून घ्यावा लागतो.

हिंदू अविभक्त कुटुंबा (HUF) मध्ये सामान्यता, पूर्वज, वंशज, अविवाहित मुली आणि मुले त्यांच्या बायका यांचा समावेश होतो.

हिंदू अविभक्त कुटुंब हिंदू, शीख, जैन आणि बौद्ध धर्मातील लोक देखील तयार करू शकतात.

हिंदू अविभक्त कुटुंबाचा (HUF) (deed) डिड तयार झाल्यानंतर पॅन कार्ड, बँक खाते हे सर्व ओपन करू शकतात. आणि हिंदू अविभक्त कुटुंब (¦eed) (HUF) मध्ये व्यवसाय, गुंतवणूक करू शकतात.

क्णत्रऋ (हिंदू अविभक्त कुटुंब) मध्ये प्रत्येक सदस्य त्याच्या उत्पन्नातून कॉर्पस म्हणजेच भांडवल जमा करू शकतात.

कुटुंबातील व्यक्तीच्या वैयक्तिक, कौशल्य, कलेने मिळवलेले उत्पन्न हे हिंदू अविभक्त कुटुंबातील उत्पन्नात ग्राह्य धरले जात नाहीत जसे अभिनय, गायन, सिंगिंग, डान्स, खेळाडू किंवा वैयक्तिक कौशल्य, कला यातून आलेले उत्पन्न हिंदू अविभक्त कुटुंबात घेतले जाऊ शकत नाही. कारण ते कुटुंबातील सदस्याच्या वैयक्तिक कौशल्य , कले मधून आलेले असते.

हिंदू अविभक्त कुटुंब (HUF) तयार करण्याचे कर फायदे काय आहेत?

आयकर लाभ: हिंदू अविभक्त कुटुंब क्णत्रऋ ही सभासदांची एक वेगळी कायदेशीर संस्था असल्याने आणि स्वतंत्र पॅन धारण करत असल्याने, ते उत्पन्न मिळवू शकते, स्वतः चा व्यवसाय चालवू शकते आणि शेअर्स, मालमत्ता इत्यादींमध्ये गुंतवणूक करू शकते.

निवासी घर : हिंदू अविभक्त कुटुंबाच्या नावाने निवासी मालमत्ता घेऊ शकता.

गुंतवणूक: एक HUF ELSS सारख्या कर-बचत योजनांमध्ये देखील गुंतवणूक करू शकतो आणि आयकर कायद्या अंतर्गत रु. १,५०,००० पर्यंत कर लाभ मिळवू शकतो. आयकर कायद्याच्या अंतर्गत कर लाभ मिळवण्यासाठी हिंदू अविभक्त कुटुंबला कर-बचत मुदत ठेवी आणि इक्विटी-लिंक्ड बचत योजना मध्ये गुंतवणूक करण्याची परवानगी आहे. जरी हिंदू अविभक्त कुटुंब स्वतः च्या नावाने सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी (पीपीएफ) खाते उघडू शकत नसला तरी, तो हिंदू अविभक्त कुटुंबाद्वारे त्याच्या सदस्यांच्या संबंधित पीपीएफ खात्यांमध्ये जमा केलेल्या रकमेवर कर कपातीचा दावा करू शकतो.

सरकारी नोकरी करणाऱ्या व्यक्तींना व्यापार व्यवसाय करण्यास ज्यावेळेस काही कायदेशीर बंधने असतात त्यावेळेस हिंदू अविभक्त कुटुंब स्थापित करून त्यामध्ये व्यवसाय सुरू करता येतो.

कायदेशीर रित्या टॅक्स नियोजन करून कुटुंबातील व्यक्तींचा कर वाचवता येतो.

हिंदू अविभक्त कुटुंबाच्या माध्यमातून कायदेशीर मार्गाने कर बचती चे नियोजन :–

हिंदू अविभक्त कुटुंबाच्या माध्यमातून आपण आपला आयकर वाचवू शकतो जसे की आपल्याला वारस हक्काने मिळणारी स्थावर मालमत्ता किंवा वारस हक्काने मिळणारी गुंतवणूक ही आपण कुटुंबातील सदस्यांच्या वैयक्तिक खात्यात न घेता किंवा कुटुंबातील सदस्यांच्या नावाने न करता तिला आपण हिंदू अविभक्त कुटुंबाच्या नावाने घेतली तर त्या मालमत्ता आणि गुंतवणुकीतून येणारे उत्पन्न हे हिंदू अविभक्त कुटुंबाच्या उत्पन्नात गणले जाईल. आणि त्यावर ४ लाखाची आयकर कायद्याची मूलभूत सूट मिळू शकेल. त्याचा कोणताही कर कुटुंबातील सदस्याला वैयक्तिक भरावा लागणार नाही.

हिंदू अविभक्त कुटुंबाच्या नावाने जर गुंतवणूक असेल आणि त्याच्यातून उत्पन्न येत असेल तर हिंदू अविभक्त कुटुंबाच्या नावाने देखील आयकर विवरणपत्र भरणे आवश्यक असते.

---

# माझे दोन छोटे दोस्त





आजोबा म्हणजे नातवाचा पहिला दोस्त. नंतर लाख दोस्त आले तरी पहिल्या दोस्ताची सर नाही. आणि नातू म्हणजे आजोबाचा शेवटचा दोस्त. त्याच्यानंतर दुसऱ्या दोस्तांची गरजच नाही. म्हणजेच मी तुझी सुरुवात आणि तू माझा शेवट

या ओळी वाचल्या की आजोबा आणि नातवाच्या नात्याचा खरा अर्थ मनाला स्पर्श करून जातो. माझ्यासाठी या ओळी केवळ कविता नाहीत; त्या माझ्या आयुष्याचा अनुभव आहेत. कारण माझ्या आयुष्यात चैतन्य आणि चिन्मय हे दोन छोटे दोस्त आले आणि माझ्या जगण्याची लयच बदलून गेली.

चैतन्य आणि चिन्मय यांना शाळेत सोडणे, शाळा सुटल्यावर त्यांना घरी घेऊन येणे, त्यांच्या छोट्या-मोठ्या गरजा पाहणे, त्यांच्या आवडी लक्षात ठेवणे, कपडे किंवा एखादी आवडती वस्तू घेऊन देणे, त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणेहे सगळे आता माझ्या दिनक्रमाचा भाग झाले आहे. त्यांच्या शाळेची वेळ म्हणजे माझ्या दिवसातील एक महत्त्वाची वेळ. त्यांना सोडायला जाताना घड्याळाकडे पाहण्यापेक्षा त्यांच्या चेहऱ्याकडे पाहण्यातच मला अधिक आनंद मिळतो.

चैतन्य आणि चिन्मयच्या जगात प्रत्येक दिवस नवा असतो. काल विचारलेला प्रश्न आज वेगळ्या पद्धतीने विचारला जातो. काल आवडलेली गोष्ट आज आवडेलच असे नाही. एखादी छोटी वस्तू त्यांच्यासाठी खूप महत्त्वाची असते, तर आपल्याला मोठी वाटणारी गोष्ट त्यांच्या लक्षातही येत नाही. त्यांच्या या जगात शिरले की माझे स्वतःचे वय मला विसरायला होते.

त्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना मी पुन्हा लहान होतो. त्यांच्या खेळात सहभागी होताना माझ्यातला बालक जागा होतो. त्यांच्या छोट्या-छोट्या हट्टांना मान देताना चेहऱ्यावर नकळत हसू येते.

त्यांच्यासोबतचे हे छोटे क्षण कधी माझ्या आयुष्याच्या मोठ्या आठवणी बनून जातात, हे कळतही नाही.

पावसाळ्यात मात्र माझी काळजी थोडी वाढते. पाऊस असला की शक्यतो मी चारचाकी गाडीने चैतन्य आणि चिन्मयला शाळेत सोडायला जातो. दोघे गाडीत बसले की बाहेरचा पाऊस त्यांच्यासाठी एक मजेदार अनुभव असतो. काचेतून बाहेर पाहत ते पावसाचे थेंब, रस्त्यावर साचलेले पाणी, धावणारी माणसे आणि वेगवेगळ्या गाड्या पाहत असतात.

पण त्या दिवशी पाऊस पडत असतानाही चिन्मयच्या मनात काहीतरी वेगळेच होते.

मी चारचाकी गाडी काढण्याच्या तयारीत होतो. तेवढ्यात चिन्मय म्हणाला,

बाबा, आज आपण स्कुटीवर जाऊया!

मी त्याच्याकडे पाहिले.

स्कुटीवर? पाऊस आहे ना!

तो अगदी सहजपणे म्हणाला,

मग रेनकोट घालू!

मी हसत म्हणालो,

पण माझ्याकडे रेनकोट नाही रे.

क्षणाचाही विलंब न करता चिन्मय म्हणाला,

मग बाबांचा रेनकोट घ्या!

त्याचा हा उपाय ऐकून मला हसू आले. त्याच्या दृष्टीने प्रश्न अगदी सोपा होता. आजोबांकडे रेनकोट नाही, पण बाबांकडे आहे; मग प्रश्नच काय?

माझ्याकडे स्वतःचा रेनकोट नव्हता. लगेच नवीन रेनकोट आणणेही शक्य नव्हते. पण चिन्मयच्या त्या छोट्याशा सूचनेत मला त्याची काळजी दिसत होती.

तो पुन्हा म्हणाला,

बाबांचा रेनकोट घ्या ना!

त्याच्या आवाजातला आग्रह आता अधिक प्रेमळ वाटत होता.





शेवटी मी त्याच्या वडिलांचा रेनकोट घेतला आणि अंगावर चढवला.

रेनकोट घालताना मात्र माझ्या मनात एक वेगळाच विचार आला

बासष्ठ वर्षांच्या आयुष्यात मी कधीच रेनकोट घातला नव्हता!

कितीतरी पावसाळे आयुष्यात आले. लहानपण, तरुणपण, नोकरीची वर्षे, महाविद्यालयीन जीवन, प्रवाससगळे काही आठवले. पावसापासून वाचण्यासाठी छत्री वापरली असेल, कधी पावसात भिजत गेलो असेन; पण रेनकोट मात्र कधी अंगावर आला नव्हता. आणि आज?

आजोबांनी रेनकोट घातला होतातोही आपल्या नातवाच्या आग्रहाखातर!

मला स्वतःलाच हसू आले.

चैतन्य आणि चिन्मय तयार होते. स्कुटी सुरू केली आणि आम्ही पावसात शाळेकडे निघालो.

पाऊस पडत होता. रस्त्यावर पाणी साचले होते. समोरून येणाऱ्या वाहनांच्या चाकांमधून पाणी उडत होते. वातावरणात पावसाचा गारवा होता.

पण त्या दिवशी मला पावसाची फारशी चिंता वाटत नव्हती.

माझ्या अंगावर रेनकोट होता आणि मनात माझ्या दोन छोट्या दोस्तांचे प्रेम.

स्कुटी चालवत असताना माझ्या मनात एक गंमतीदार विचार सुरू झाला.

मी आयुष्यभर विद्यार्थ्यांना शिकवत आलो आहे. विविध विषयांवर मार्गदर्शन केले आहे. झशशअॅ ऋॉर्ीं ढअॅरळपळपस मध्ये मित्रांचा दबाव, मित्रांच्या आग्रहाचा परिणाम आणि स्वतःचा निर्णय घेण्याचे महत्त्व याबद्दल मी शिकवले आहे.

विद्यार्थ्यांना सांगताना मी नेहमी विचार करायचोमित्रांचा दबाव आपल्याला योग्य दिशेने घेऊन जातोच असे नाही. त्यामुळे विवेकाने निर्णय घ्यायला हवा.

पण त्या दिवशी माझ्याच आयुष्यात एक वेगळे झशशअॅ ऋॉर्ीं ढअॅरळपळपस सुरू झाले होते!

माझे दोन मित्र होतेचैतन्य आणि चिन्मय.

त्यांच्याकडे कोणतेही प्रशिक्षण नव्हते. कोणतेही भाषण नव्हते. कोणतेही तत्त्वज्ञान नव्हते.

फक्त प्रेम होते.

आणि त्या प्रेमाच्या आग्रहापुढे मी आनंदाने झुकलो होतो.

मला त्या क्षणी जाणवले की प्रत्येक दबाव वाईट नसतो. काही आग्रह आपल्याला चुकीच्या दिशेने नेतात; पण काही आग्रह आपल्या आयुष्यात आनंद घेऊन येतात. काही आग्रहांमागे स्वार्थ नसतो, अपेक्षा नसतेफक्त आपल्याबद्दलची काळजी असते.

चिन्मयचा रेनकोटचा आग्रह तसाच होता.

त्याला आजोबा पावसात भिजू नयेत असे वाटत होते.

आणि मला त्याचा **(पान ६ वर)**




नभांगणी ह्या
अरुण उगवला
पूर्व दिशेला...
प्रभातकाळी
पडे केशर सडे..
सोनेरी कडे...
तांबडं फुटे
पक्षी किलबलाट
गातसे भाट...
सडा रांगोळी
अंगणी रेखाटली
धरा लाजली...
देवळामध्ये
सुर येती मधुर
भक्ती गजर...

–विजया भट, धुळे

## आला श्रावण!

हा मनभावन
महिना पावन
आला श्रावण!
सर सर सरी
ये धरतीवरी
समृद्धी खरी!
हिरवा पसारा
जीवांस चारा
मोर पिसारा!
हे वाहते निर्झर
छान फुलपाखरं
किती मनोहर!
हे नभी इंद्रधनू!
हर्ष किती वर्णू!

–धंजी मोरे
धुळे,मो.९४०४१९०४३२

## ऐश्वर्याचे गाव

जिथं दृष्टी जाई
तिथं दिसे हिरवाई
ऐटीत येई श्रावण
सृष्टीला देई नजराण
हिरव्या हाका रानी
संपेना मेघांची गाणी
आकाशी पाऊस खेळ
विजांचा चमचमता मेळ
वनश्रीस रोमरोमी बहर
कोण इंद्रधनुचा चित्रकार?
भेट अनोखी ऊनपावसाची
किमया ही श्रावणाची
धरेचा हिरवा उत्सव
वसले ऐश्वर्याचे गाव

–अरुण राठोड शहादा

# सोशल मीडिया चिंता आणि चिंतन

(पान ३ वरुन) डेटा बंद करून कधीतरी आई–बाबांशी गप्पा मारा, मित्रांसोबत प्रत्यक्ष मैदानात खेळा. आभासी जगातल्या 'फॉलोअर्स' पेक्षा प्रत्यक्ष आयुष्यात आपल्याला सावरणारी चार माणसे कमावणे जास्त महत्त्वाचे आहे.

: सोशल मीडियाचा इतिहास हा खूप रंजक आहे. याची सुरुवात इंटरनेटच्या सुरुवातीच्या काळापासून झाली, जेव्हा लोकांना एकमेकांशी ऑनलाईन जोडण्याची ओढ लागली होती.

खाली सोशल मीडियाच्या प्रवासाचे महत्त्वाचे टप्पे दिले आहेत:

१. सोशल मीडियाची सुरुवात आणि इतिहास

सोशल मीडियाची मुळे १९७० आणि ८० च्या दशकात असलेल्या 'बुलेटिन बोर्ड सिस्टम' (BBS) आणि 'उॅर्डिशऑॅश' मध्ये आढळतात. पण खऱ्या अर्थाने आधुनिक सोशल मीडियाची टप्प्याटप्प्याने प्रगती झाली:

✻ सिक्स डिग्रीज (https://www.google.com/search?q=SixDegrees.com) - 1997: याला जगातील पहिले सोशल मीडिया प्लॅटफॉर्म मानले जाते. यामध्ये वापरकर्ते स्वतः चे प्रोफाईल बनवू शकत होते आणि मित्रांची यादी तयार करू शकत होते.

✻ फ्रेंडस्टर (Friendster) आणि मायस्पेस (MySpace) - 2002-2003: या साइट्सनी सोशल मीडियाला खऱ्या अर्थाने प्रसिद्धी मिळवून दिली. विशेषतः मायस्पेस तरुणांमध्ये खूप लोकप्रिय झाले होते.

✻ फेसबुक (Facebook) - 2004: मार्क झुकरबर्गने हार्वर्ड विद्यापीठापुरते मर्यादित ठेवलेले हे प्लॅटफॉर्म पुढे जाऊन जगातील सर्वात मोठे सोशल नेटवर्क बनले.

✻ युट्यूब (YouTube) - 2005: व्हिडिओ शेअरिंगसाठी क्रांती घडवून आणली.

✻ ट्विटर (TwitterX) - 2006: मायक्रो–ब्लॉगिंगची सुरुवात झाली.

२. सोशल मीडियावरील पहिली पोस्ट कोणती होती?

वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवरच्या पहिल्या पोस्ट खालीलप्रमाणे आहेत:

प्लॅटफॉर्म,पहिली पोस्ट मजकूर कधी आणि कोणी?

पहिले ई–मेल "QWERTYUIOP" (कीबोर्डची पहिली ओळ) । १९७१, रे टॉमलिन्सन

पहिले इंस्टाग्राम – एका कुत्र्याचा फोटो (कॅप्शन: 'test') & 2010, केविन सिस्ट्रोम ।

पहिले युट्यूब – "Me at the zoo" (प्राणीसंग्रहालयातील व्हिडिओ) २००५, जावेद करीम

पहिले ट्विटर – "just setting up my twttr" 2006, जॅक डॉर्सी

३. थोडक्यात निष्कर्ष

सोशल मीडियाची सुरुवात केवळ माहिती देवाणघेवाण करण्यासाठी झाली होती, परंतु आज ते संवाद, मनोरंजन, व्यवसाय आणि राजकारण यांचे एक प्रभावी माध्यम बनले आहे. सिक्स डिग्रीज ही जरी पहिली अधिकृत सोशल साइट असली, तरी फेसबुक आणि इंस्टाग्राम ने या क्षेत्राचा चेहरामोहरा बदलला.

# माझे दोन छोटे दोस्त

(पान ५ वरुन) तो विचार मनापासून आवडला होता.

चैतन्यही या सगळ्या प्रसंगाचा साथीदार होता. दोघांच्या सहवासामुळे माझ्यासाठी तो प्रवास केवळ शाळेत जाण्याचा प्रवास राहिला नव्हता. तो माझ्या आयुष्यातील एक सुंदर आठवण बनला होता.

शाळेत पोहोचलो.

त्यांना सोडताना दोघांच्या चेहऱ्याकडे पाहिले. त्यांच्या डोळ्यांत नेहमीचीच निरागसता होती. माझ्यासाठी मात्र त्या क्षणी त्यांच्या चेहऱ्यावर मला माझे संपूर्ण जग दिसत होते.

मी विचार करू लागलो

आपण मुलांना मोठे करतो, त्यांना चालायला शिकवतो, बोलायला शिकवतो, शाळेत पाठवतो. पण एक दिवस अशी वेळ येते की हीच नातवंडे आपल्याला जगण्याची नवी पद्धत शिकवू लागतात.

चैतन्य आणि चिन्मयने मला ते शिकवले आहे. त्यांनी मला पुन्हा लहान केले आहे.

त्यांच्या प्रश्नांमुळे माझी जिज्ञासा जागी झाली आहे.

त्यांच्या हसण्यामुळे माझ्या दिवसाला अर्थ मिळाला आहे.

त्यांच्या हट्टांमुळे मला प्रेमाची भाषा समजली आहे.

आणि त्यांच्या छोट्या–छोट्या मागण्यांमुळे माझ्या आयुष्यातील साधे क्षणही आठवणींचे झाले आहेत.

शाळेतून परतताना पाऊस अजूनही पडत होता. अंगावरचा रेनकोट मला आता अजिबात विचित्र वाटत नव्हता. उलट तो मला आवडू लागला होता.

कारण तो रेनकोट माझ्यासाठी पावसापासून संरक्षण करणारा कपडा नव्हता.

तो चिन्मयच्या काळजीची आठवण होता.

आणि त्या रेनकोटच्या प्रत्येक घडीत मला चैतन्य आणि चिन्मयसोबत घालवलेले असंख्य छोटे क्षण दिसत होते.

मला जाणवलेनातवंडे मोठी होत जातील. त्यांच्या शाळा बदलतील. मित्र बदलतील. त्यांच्या जगाचा विस्तार होईल. एक दिवस कदाचित त्यांना आजोबांसोबत शाळेत जाण्याचीही गरज राहणार नाही.

पण आजचा हा काळ पुन्हा कधीच परतणार नाही.

म्हणूनच त्यांच्या प्रत्येक छोट्या आग्रहाला, प्रत्येक प्रश्नाला, प्रत्येक हसण्याला आणि प्रत्येक हट्टाला मी मनापासून जपून ठेवू इच्छितो.

मी आयुष्यभर विद्यार्थ्यांना मित्रांच्या दबावापासून सावध राहायला सांगत आलो. पण माझ्या या दोन छोट्या मित्रांच्या प्रेमळ आग्रहापुढे मात्र मला आनंदाने हार मानावी लागली.

कारण काही आग्रह टाळायचे नसतात.

ते आयुष्यभर जपायचे असतात.

चैतन्य आणि चिन्मय माझे नातू आहेत, हे नाते रक्ताचे आहे. पण त्याहून सुंदर नाते म्हणजे ते माझे दोन छोटे दोस्त आहेत.

त्यांच्या बालपणात मी माझे आजचे आयुष्य जगतो आहे आणि त्यांच्या प्रत्येक छोट्या आठवणीत माझ्या उद्याची श्रीमंती साठवतो आहे.

म्हणूनच पुन्हा त्या ओळी आठवतात

आजोबा म्हणजे नातवाचा पहिला दोस्त आणि नातू म्हणजे आजोबाचा शेवटचा दोस्त.

माझ्यासाठी मात्र या ओळी थोड्या वेगळ्या आहेत

चैतन्य आणि चिन्मय हे माझे दोन छोटे दोस्त आहेत; त्यांच्या बालपणाची साथ ही माझ्या आयुष्याची सर्वात सुंदर मैत्री आहे.

त्या दिवशी पावसाने माझा रेनकोट भिजवला असेल; पण चैतन्य आणि चिन्मयच्या प्रेमाने माझे मन पूर्णपणे ओलेचिंब झाले होते.

आणि त्या दिवसापासून माझ्यासाठी रेनकोट म्हणजे केवळ पावसापासून बचावाचे साधन राहिले नाही.

तो माझ्या दोन छोट्या दोस्तांनी मला दिलेला प्रेमाचा धडा झाला आहे.

काही पावसाळे कपडे भिजवून जातात; पण काही पावसाळे मनात कायमची आठवण ठेवून जातात.

हा पावसाळा तसाच आहे.

## आरोग्यम् धनसंपदा

डॉ.हेमंत जोशी
बाल रोग तज्ञ, ६ महिने स्तनपान रजेचे जनक, जोशी बाल रुग्णालय, रेल्वे स्टेशन समोर, विरार (प)

# गोष्ट किडमुक्त दाताची

आपले दांत असे वाचवा. जो सर्व चांगल्या दातांसह १०० वर्षे जगेल त्याला स्वर्गात सरळ प्रवेश मिळेल अशी योजना जर आली तर आपण कुणीही त्याचा लाभ घेऊ शकणार नाही.

का बरे?

कारण सरकारने भारतीयांच्या तोंडाच्या आरोग्याचा अभ्यास केला होता. तो सांगतो की खराब दात, खराब मुख आरोग्य हा आपल्या आरोग्याचा सर्वात मोठा गंभीर व दुर्लक्षित राष्ट्रीय प्रश्न आहे. १० पैकी ९ मोठ्या लोकांचे दात, हिरड्या खराब आहे. अनेकांच्या तोंडाला खराब वास येतो. ५ वर्षांच्या निम्म्या मुलांचे दात किडले आहेत. दर दुसऱ्या माणसाचा एक तरी दात ढिला आहे किंवा पडला आहे. साठ वर्षावरील जर तिसऱ्या माणसाचे सर्व दात पडलेले आहेत.

याची २ कारणे आहेत.

१. साखर. २. कमजोर दात.

१.साखरेची गोष्ट

आपण सरासरी रोज ५० ग्राम साखर खातो.असा जागतिक आरोग्य संघटनेचा अहवाल आहे. साखर दातांना चिटकते. तेथे दांत किडतात. शिजवलेले मउ अन्न दाताच्या फटीत राहते. नासते. दात हिरड्या खराब करते. दर तिसरा माणूस काही खाल्ल्यावर चूळ भरत नाही. चौथा माणूस बिडी ओढतो. तंबाखू खातो. याने दांत हिरड्या खराब होतात. दारू पिणाऱ्यांचे पण दात हिरड्या खराब होतात.

हे टाळा.

यासाठी खालील गोष्टी करा. लगेच.

१. प्रत्येक निम्मा घास कच्चा हवा. भाजी कोशिंबीर फळाचा हवा. काहीही खाताना शेवटी भाज्या कोशिंबिरी फळे खा. ते झाडूचे काम करून दात साफ करतात. २ बडी शोप खा. पान खा. ते पण झाडूचे काम करतात. विडया च्या पानातील चुना दात कीड थांबवतो. दात व हाडे बळकट करतो. २. काहीही खाल्ल्यावर चूळ भरा. साखर असलेले चहा, थंड पेय घेतल्या वर पण चूळ भरा. काही खाल्ल्यावर, जेवल्यावर चूळ भरा. दात साफ करा. याने दात खराब होण्याचे प्रमाण निम्मे होते. ३. साखरेने दात किडतात. साखरेचा गोड पदार्थांचा, गोड पेयांचा वापर थांबवा. गोड फक्त सणाला खा. घरात साखर, गोड नको. चहात साखर नको. गोळ्या चॉकलेट बिस्कीट नको.मिठाई नको. त्याऐवजी




फळे,सुका मेवा वापरा. ४. दात घासतांना पेस्ट पावडर सह मीठ घ्या. मिठाने दात किडवणारे जंतू मरतात. असे सूक्ष्म रोग शास्त्र सांगते. याने तोंडाचा वास जातो. हे अनुभवाचे बोल आहेत. ५. फ्लूराईड असलेल्या पेस्ट चा वापर करा. फ्लूराईड ने दांत मजबूत होतात, ६. आजच आपल्या डॉक्टर ना आपले सर्वांचे दात दाखवा. जमले तर दाताच्या डॉक्टर कडे जा. दर वेळी डॉक्टर कडे गेले की दात दाखवा. ७. दर तिसरा माणूस तंबाखू वापरतो. तंबाखूला पहिल्या वेळेस नाही म्हणा. तंबाखू विष आहे. त्याने हिरड्या खराब होतात. चव आणि वास कमी होतात. दातांचा रंग खराब होतो हृदयविकार होतो कर्करोग होतो. उच्च रक्तदाब होतो. ८.दर दहावा वा माणूस दारू पितो.दारू ला पहिल्या वेळेस नाही म्हणा. २. कमजोर दात. आपले दात हिरड्यांच्या हाडामध्ये निसर्गाने बसवले आहेत. अभ्यासातून असे दिसून आले आहे की, ८५ % भारतीयांमध्ये ड जीवनसत्व कमी असते. ६०% पेक्षा जास्त लोकांना रोज च्या आहारात चुना म्हणजे कॅल्शियम कमी असते. हे अगदी गर्भवती मातात पण कमी असतात. याने सर्वांची हाडे व दात मुळातच कमजोर होतात.

मुलांमध्ये यामुळे दात खालील प्रकारे खराब होतात. १. दात उशिरा येतात. त्यांना ड जीवन सत्व व चुना म्हणजे कॅल्शियम दिले की त्याचे दात येतात.आपल्याकडील छोट्या बाळांना ड जीवनसत्त्व व कॅल्शियम द्यायला हवे.त्यांना दुपारच्या उन्हात त्यांना सहन होईल एवढा वेळ उघडे न्यायला हवे. २.दात पातळ,खडबडीत , कमजोर होतात. त्यांची चमक जाते. दातांचा रंग बदलतो. ते पिवळसर होतात. त्यावर तपकिरी डाग पडतात.दातांवर खडूच्या रंगाचे पांढरे डाग पडतात. ३.वारंवार दात किडतात. कमकुवत दात सहज तुटतात. ४.हिरड्यांचा त्रास . हिरड्यांमधून रक्त येणे, दात सैल होणे, हिरड्या मागे सरकणे. ड व क (सी )जीवन सत्व यांच्या कमतरतेमुळे हिरड्या कमकुवत होतात. ते मुलांना द्या. घरात एकाला ड जीवन सत्व व चुना म्हणजे कॅल्शियम कमी असेल तर ते सर्वांना कमी आहे असे समजा. सर्वांनी सकाळी १० ते दुपारी १० या काळात जमेल तेवढे वेळ उन्हात काम करावे. आपल्या अर्ध्या अंगावर ऊन पडायला हवे.याने आपल्या चामडी खाली ड जीवनसत्त्व बनते. ते प्रतिकार शक्ती वाढवून आपले सर्व आजार कमी करते. सर्वांनी जेवल्यावर दोनदा विड्याचे पान खावे. त्यातून चुना मिळतो. आपल्याकडे गर्भवतींना व बाळंतिणीला मुद्दाम विड्याचे पान देतात. ते बरोबर आहे. हे जो जमे पर्यंत सर्वांनी ड जीवनसत्त्व ६० ००० युनिटची पावडर औषधी दुकानातून घेऊन दरमहा एकदा घ्यावी. चुन्याची ५०० मिलिग्रामची जेनरिक स्वस्त गोळी घ्यावी. मोठ्यांनी पण आपल्या दातांची काळजी अशीच घ्यावी. ठाण्याचे दाताचे मोठे डॉक्टर अश्विन जावडेकर सध्या इंग्लंड ला दंतवैद्यकशास्त्र शिकवतात. ते सांगतात की भारतात १०ते १५ % मुलांचे दात ड जीवन सत्व व चुना म्हणजे कॅल्शियम कमी असल्याने कमजोर आहेत. व दात कमजोर असल्यामुळे त्यांना दातांचे विविध त्रास होतात. ड जीवन सत्व व चुना म्हणजे कॅल्शियम कमी असल्याने किती मुलाचे दात कमजोर झाले. या विषयावर जगभर अनेक अभ्यास झाले.

डॉक्टर अश्विन जावडेकर व डॉक्टर शमिका कामत यांनी या विषयावर झालेल्या जगातल्या सर्व अभ्यासाचा अभ्यास केला. त्यांचाही निष्कर्ष असाच आहे की १४% मुलांचे दात ड जीवन सत्व व चुना म्हणजे कॅल्शियम कमी असल्याने कमजोर आहेत. व दात कमजोर असल्यामुळे त्यांना दातांचे विविध त्रास होतात.

धडा.: आपल्यापैकी बहुतेकांचे दात ड जीवन सत्व व चुना म्हणजे कॅल्शियम कमी असल्याने कमजोर आहेत. व दात कमजोर असल्यामुळे आपल्याला दातांचे विविध त्रास होतात. आपण जाणीवपूर्वक ड जीवनसत्व चुना घेऊन सशक्त झाले पाहिजे. हे सर्वांना तात्काळ सांगायला हवे. आज भारताची लोकसंख्या १४६ कोटी आहे.१४६ कोटी लोकांना दाताच्या डॉक्टर ची गरज आहे. प्रत्येक सरकारी दवाखान्यात, प्राथमिक आरोग्य केंद्रात एक दाताचा डॉक्टर हवा. दातांचा इलाज खूप महाग आहे. त्यापेक्षा दात चांगले राखणे बरे. व हिरड्या किडू नये म्हणून काय करावे हे सर्वांना युद्ध पातळीवर शिकवायला हवे. ही माहीती सर्वांना द्या. लगेच द्या.

# म्हणींच्या गोष्टी..

(पान ४ वरुन) लगोरीचे प्रकार, भोवरे इ. मग टोळधाड आल्यासारखी सगळी मुले एकदम घरात घुसतात, खेळांवर कब्जा करायचा, कुणी पाणी मागतं, कुणी नविन खेळ जो वर ठेवलाय तो काढायला लावतं, ती उस्तवार करायला मी नाहीतर सून आणि लहान नातु नुसताच मागेमागे करत असतो, घोडं मेले ओझ्यानी, अन् शिंगरू मेलं हेलपाट्यानी तद्वत, मग भांडाभांडी करायला लागले तर सांगावं लागतं आता बास, मुलं घरी गेल्यावर मोठा नातु भाव खात बघ आजी किती मित्र आहेत सगळे माझ्याकडेच येतात दुसऱ्या मित्रांकडे जात नाहीत, मग मी त्याला म्हणते असतील शिते तर जमतील भूते कधी कधी गृहपाठ जास्त असतो, हस्तकला काही बनवून न्यायचं असतं, सगळ्याची तयारी घेऊन बसायचं आणि मग हा आला तो आला मध्ये सगळं राहून जातं, मग एक ना धड भाराभर चिंध्या असं म्हणावं लागतं. कधी कधी आपण सहज खाऊ संपलाय का आहे, म्हणून डबे उघडून बघावं तर घरी नसताना उद्योग करून झालेला असतो, खाऊ संपवून डबे जसेच्या तसे असतात आणि न विचारताच उत्तर येतं आम्ही नाही बरं का आजी खाल्लं आणि खाई त्याला खवखविची प्रचिती येते, काकणा ला आरसा कशाला? मुलांना नेहमी मी सांगते प्रयत्नांती परमेश्वर आणि दुसरी अंथरूण पाहून पाय आणि तिसरी सरी सरी म्हणून दोरी घातली तर फासच बसतो दुसऱ्यांची बरोबरी करायची नाही, रात्री झोपताना देवाचे आभार मानायचे, एक श्लोक म्हणायचा ''डोळ्यांनी बघतो ध्वनि परिसतो, कामी पदी चालतो, जिव्हेने रस चाखतो मधुरही, वाचे आम्ही बोलतो, हाताने बहुसाळ काम करतो, विश्रांती ही घ्यावया, घेतो झोप सुखे फिरुनी उठतो, ही ईश्वराची दया'' अशाप्रकारे मी व माझ्या नातवांचा संवाद असतो, आपली मराठी भाषा खूप समृध्द आहे, कितीतरी प्रकारच्या अलंकारांनी युक्त अशी आहे, म्हणी ,वाक्प्रचार, यमक, श्लेश, अलंकार, काना, मात्रा, वेलांटी इ. म्हणींमध्ये जीवनातील विशिष्ट अनुभव, माहिती व सत्य उपदेश आहे, म्हणींच्या विचारात मार्मिकता आहे, म्हणून ऐकावे जनाचे करावे मनाचे नाहीतर भित्या पाठी ब्रह्मराक्षस अशी स्थिती आणि कडू कार्लं तुपात घोळा नाहीतर साखरेत घोळंल कडू तर कडूच राहतं.



सुमेध रानडे
मो.९५६१०९३७४०

# राशी भविष्य

**मेष:** हा सप्ताह तुमच्यासाठी दिलासादायक असणार आहे. तुमच्या शिक्षकांचा, मोठ्या व्यक्तींचा आणि साथीदारांचा तुम्हाला पाठिंबा मिळेल. काहीतरी नवीन शिकाल आणि शिकवाल. कर्तव्याला न चुकता काम केले तर समाधानकारक फळ मिळेल. या आठवड्यात तुम्ही तुमच्या मार्गदर्शक व्यक्तींचा सल्ला अजिबात टाळू नका. त्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालून तुमचे चांगले होणार आहे. नियमात बसेल असेच वागा आणि त्याप्रमाणे काम करा. जोखीम किंवा चौकटीबाहेरच्या गोष्टींना आत्ता हात घालू नका. प्रयत्नांना प्रार्थनेची शक्ती जोडा!

**वृषभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी एक पाऊल पुढे टाकण्याचा आहे. तुम्ही एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोचणार आहात. मागे केलेल्या नियोजनाला आणि कष्टाला चांगले यश मिळेल. पण मार्गावर पुढे जाण्यासाठी कुठल्यातरी गोष्टीची वाट बघावी लागेल. लोकांचं सहकार्य मिळेल. यात्रा किंवा प्रवास संभवतात. नोकरी व्यवसायात अपेक्षित घटना घडायला वेळ लागेल. या आठवड्यात तुम्हाला धैर्य आणि संयम ठेवण्याची गरज आहे. आहात त्या मार्गावर पुढे जाताना, विचारमंथन करा, इतरांचे मत जाणून घ्या. कामाचा विस्तार कसा करता येईल हा विचार करा.

**मिथुन:** हा सप्ताह तुमच्यासाठी वेगवान असणार आहे. तुमचे अडकलेले काम नक्कीच या काळात मार्गी लागणार अशी खूप शक्यता आहे. तुम्हाला कुठेतरी सारखी ये जा करावी लागू शकते. लगीनघाई असल्यासारखे वाटेल. चांगल्या कामासाठी धावपळ होईल. हवी असलेली बातमी येईल किंवा त्यासंबंधी काही माहिती कळेल. या आठवड्यात तुम्ही आळस झटकून कामाला लागण्याची गरज आहे. तुमच्याकडून कोणताही उशीर करु नका. तुमचे संभाषण संवाद यांकडे लक्ष द्या. तुमचा सक्रिय सहभाग ठेवा. काही कामांचा आपणहून पाठपुरावा करा. जितके कष्ट कराल तितके फळ हे निश्चित!

**कर्क:** हा सप्ताह तुमच्यासाठी पूर्णत्वाचा असणार आहे. कुठलेतरी काम एका टप्प्यापर्यंत पूर्ण होईल. काहीतरी मिळवल्याचे समाधान वाटेल. घडून गेलेले बदल आता चांगल्या प्रकारे फळास येतील. एखाद्या त्रासातून, किंवा बंधनातून मुक्त व्हाल. प्रवासयोग संभवतात. या आठवड्यात तुम्हाला जे मिळेल ते मोठ्या मनाने स्वीकारण्याची गरज आहे. संकुचित वृत्ती सोडून व्यापक विचार ठेवा. सगळ्यांना सामावून घ्या. आनंदी मनाने एखाद्या गरजवंताला दान करा. सामाजिक कार्य करा. ''जीना इसी का नाम है!'' या गाण्याचे बोल आठवा आणि त्याप्रमाणे वागा!

**सिंह:** हा सप्ताह तुमच्यासाठी धैर्य

## २३ ऑगस्ट ते २९ ऑगस्ट

**कन्या वृश्चिक मीन या राशींना लाल थांबा**

**वृषभ सिंह धनू मकर कुंभ या राशींना पिवळा दिवा**

**मेष मिथुन कर्क तूळ या राशींना हिरवा झेंडा**



आणि संयमाचा कस लावणारा असणार आहे. तुमच्यातील चांगुलपणाची एक प्रकारे परीक्षा होईल. पण तुम्ही जर या परीक्षेत उत्तीर्ण झाला तर पुढचा मार्ग निश्चितच सोपा होईल. काहीतरी मिळवायला वाट बघावी लागेल. या आठवड्यात तुम्ही नियमसंयम ठेवून वागलात तर तुम्हाला तुमच्या अपेक्षित ध्येयापर्यंत पोचणे सोपे जाईल. राग लोभ मत्सर अशा तमोगुण प्रधान वृत्तीवर शुद्ध सात्विक शांत भावनेने मात करा. सौम्य शांततेचा मार्ग निवडणे म्हणजे सुध्दा एक प्रकारचे धाडसाचे काम आहे हे विसरु नका.

**कन्या:** हा सप्ताह तुमच्यासाठी एका महत्त्वाच्या कलाटणीचा असणार आहे. तुमच्या मनाप्रमाणे नसलेले बदल घडतील आणि तुम्हाला शरणागती पत्करावी लागेल. अपेक्षित ध्येय गाठण्यात अजून वेळ आणि कष्ट लागतील. पण असं असूनही घाबरु नका, हे बदल सुधारणा करण्यासाठी गरजेचे आहेत. ''बदल हा निसर्गाचा नियम आहे'' हे विसरू नका! या आठवड्यात तुम्ही स्वतःचा अहंकार आणि मोठेपणा बाजूला ठेवून वागण्याची गरज आहे. आलेल्या परिस्थितीशी झगडायला जाऊ नका, शांतपणे स्वीकार करा. उद्याचा सूर्य उगवण्यासाठी आजची रात्र सरावी लागते!

**तूळ:** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाच्या घडामोडी घेऊन येत आहे. तुमच्यासाठी नवीन असलेल्या कामासाठी किंवा जबाबदारीसाठी तुमची नेमणूक होऊ शकते. तुम्हाला अगदी पहिल्या पायरीवर असल्यासारखे वाटेल. नाविन्यपूर्ण गोष्टी शिकाल. नव्या संधी, नवीन उमेद, नवी दिशा मिळेल. या आठवड्यात तुम्ही अनुभवाचा आणि ज्ञानाचा चष्मा थोडा बाजूला करून आलेले काम अगदी नवख्या डोळ्यांनी बघण्याची गरज आहे. नवीन काहीतरी शिका, नवीन लोकांशी मैत्री करा. स्वतःला मोकळं सोडा. ''फिरुनी नवी जन्मेन मी'' याप्रमाणे नवीन संधी स्वीकारा!

**वृश्चिक:** हा सप्ताह तुमच्यासाठी काही अडथळे आणि अडचणी घेऊन येत आहे. हव्या तशा वेगाने कामे पुढे सरकणार नाहीत. अडकलेली कामे तशीच राहण्याची शक्यता आहे. पण असं असूनही तुम्हाला त्याचा फार त्रास होणार नाही. तुम्ही तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करुन चांगल्या पद्धतीने पुढे जाऊ शकणार आहात. या आठवड्यात तुम्ही एक नवीन दृष्टिकोन ठेवण्याची गरज आहे. आलेली अवघड परिस्थिती तुम्हाला नक्की शिकवायला आणि समृद्ध करायला आली आहे असा सकारात्मक विचार ठेवून उत्तर शोधण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला नक्कीच यश येईल. संयम आणि धैर्य ठेवा.

धनू: हा सप्ताह तुम्हाला बुद्धीचातुर्य दाखवण्याचे प्रसंग घेऊन येत आहे. महत्वाचे संवाद घडतील. दुसऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यापेक्षा नियम आणि कर्तव्य यांना प्राधान्य द्यावं लागेल. काही प्रमाणात वाद संभवतात. कामामध्ये नियोजनाचा एक टप्पा गाठला जाईल! पण हे सगळं करताना कुठेतरी एकटे पडल्यासारखं वाटेल! या आठवड्यात तुम्हाला तुमचं बोलणं, एकदम स्पष्ट ठेवण्याची गरज आहे. जे बोलाल ते आत्मविश्वासाने बोला आणि तसं वागा. संशयाला, खोट्याला अजिबात जागा ठेवू नका. पक्षपात करू नका. अनुभवी व्यक्तीचा सल्ला घेऊन मग निर्णय घ्या. न्याय आणि नीतीने वागा.

**मकर:** हा सप्ताह तुमच्यासाठी नवीन ऊर्जा घेऊन येत आहे. तुमच्यातील जिद्द, धाडस, काहीतरी करून दाखवण्याची वृत्ती, या सगळ्यांचा उपयोग करुन तुम्हाला हवं असलेलं काहीतरी मिळण्याची शक्यता आहे. सकारात्मक घटना घडतील. इतरांकडून मान सन्मान आणि सहकार्य मिळेल. लोकांना तुमचा सहवास आवडेल. या आठवड्यात तुम्ही काहीही झालं तरी खचून जाऊ नका. सकारात्मक दृष्टिकोन ठेवा. लढण्याची वृत्ती ठेवा पण कोणाशी विनाकारण भांडू नका. आत्मविश्वास, प्रसंगावधान आणि खेळाडू वृत्ती ठेवा. चांगले नेतृत्व करा.

**कुंभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाचा आहे कारण तुमच्या समोर अशी परिस्थिती येईल जिथे तुमच्या धैर्याचा आणि संयमाचा कस लागेल. तुम्हाला हव्या तशा वेगाने गोष्टी घडणार नाहीत. जे मिळायला हवे, त्यात काहीतरी कमी राहू शकते. तुम्हाला मध्यस्ती करावी लागू शकते. गरजेपुरते काम भागेल. मध्यम फलदायी असा हा सप्ताह राहील. या आठवड्यात तुम्ही धैर्य ठेवा, संयम ठेवा, मन शांत ठेवा. कोणत्याही प्रसंगात मध्यम मार्ग निवडा. संथ गतीने वाटचाल करा, घाई गडबड करू नका. सगळ्या पसाऱ्यातून चांगलं काय ते निवडा. इतरांना मदत करा त्यातून तुम्हाला समाधान मिळेल!

**मीन:** हा सप्ताह तुमच्यासाठी खोळंबलेला काळ घेऊन येत आहे. गोष्टी अडकल्यासारख्या वाटतील. पटापट काही घडणार नाही. त्यामुळे तुम्हाला बेचैन वाटू शकतं. कामाच्या ठिकाणी तेच तेच काम करुन कंटाळा येण्याचा संभव आहे. मनातून उत्साह कमी राहील. या आठवड्यात तुम्ही तुमच्याकडे जे चांगलं आहे, त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. जे नाही त्यामुळे स्वतःला त्रास करुन घेण्यापेक्षा आहे त्यात आनंद मानायला शिका. इतरांमुळे तुम्हाला त्रास होत असेल तर संयम ठेवा, माणसं आणि नाती पटकन तोडायला जाऊ नका.

## पान १ वरुन

## मृतांची संख्या ६२६ वर पोहोचली

आहेत. तिकडे टेलिफोन आणि संपर्क यंत्रणा सुरू असल्याने हे सर्व नागरिक आपल्या कुटुंबाच्या संपर्कात आहेत. भारतीय दूतावास त्यांचे गटप्रमुख आणि टूर ऑपरेटर्सशी सतत बोलून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

नेपाळमधील पूरग्रस्त भागातून सुटका करण्यात आलेले तमिळनाडूतील २१ नागरिक इंडिगोच्या विमानाने सुरक्षितपणे दिल्लीत पोहोचले आहेत. काठमांडूमध्ये भारतीय प्रमुखांनी (दूताने) स्वतः त्यांची भेट घेऊन विचारपूस केली होती. त्रिशूली-१ जलविद्युत प्रकल्पात अडकलेल्या ६३ भारतीय कामगारांना गुरुवारी सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. चीनच्या बाजूला अडकलेले ९६ भारतीय नागरिक जमिनीच्या मार्गाने सुरक्षितपणे नेपाळच्या सीमेत दाखल झाले आहेत. आता त्यांना मायदेशी आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

रणधीर जायसवाल यांनी सांगितले की, बेपत्ता नागरिकांची संख्या ३२० असली तरी ही आकडेवारी सतत बदलत आहे. सध्या अनेक याद्यांची पडताळणी करण्याचे काम सुरू आहे. भारतीय वंशाचे जे १०० लोक बेपत्ता आहेत, त्यांच्याकडे इतर देशांचे नागरिकत्व असू शकते आणि ते मानसरोवर यात्रेसाठी गेले असण्याची शक्यता आहे. या भीषण परिस्थितीचा सामना करण्यासाठी आणि नागरिकांना मदत पुरवण्यासाठी नवी दिल्लीतील परराष्ट्र मंत्रालय, काठमांडूमधील भारतीय दूतावास आणि बीजिंगमधील भारतीय दूतावास या तिन्ही ठिकाणी २४ तास कंट्रोल रूम सुरू करण्यात आल्या आहेत. भारत सरकार नेपाळला सर्व प्रकारची मदत पुरवण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. शोध व बचावकार्यामध्ये ७,४५१ सुरक्षा सैनिक सहभागी झाले आहेत. त्यामध्ये नेपाळ लष्कराच्या २,३९१ सैनिकांचा समावेश आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. त्याचवेळी भोटेकोशी नदीच्या पाण्याची पातळी वाढल्यामुळे नव्याने पूर येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## जरांगेंचे पुन्हा अंतरवालीत उपोषण

आले आहेत किंवा कागदोपत्री कुणबी नोंद असूनही प्रमाणपत्र मिळालेले नाही, अशा व्यक्तींनी अंतरवाली सराटीत दाखल व्हावे, असे आवाहन त्यांनी केले होते.राज्य सरकारच्या माहितीनुसार, २४ ऑगस्टपर्यंत कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेल्या १४ लाख ३१ हजार ६३४ अर्जदारांपैकी १४ लाख २४ हजार ६३४ जणांना प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. १ हजार ६४७ अर्ज प्रलंबित असून ५ हजार २४८ अर्ज फेटाळण्यात आले आहेत. मात्र, नोंद असलेल्या सर्व ५८ लाख व्यक्तींना प्रमाणपत्र मिळाले पाहिजे, या भूमिकेवर जरांगे ठाम आहेत. कागदोपत्री पुरावे उपलब्ध असूनही काही वैध दावे फेटाळले जात असल्याचा आरोप जरांगे यांनी केला. जात पडताळणी समितीची प्रक्रियाच रद्द करून तहसीलदार आणि उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना प्रमाणपत्र देण्याचे अधिकार द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली. कागदोपत्री पुरावे जुळत असतानाही दावे फेटाळले जात आहेत. इतर राज्यांत तहसीलदार आणि एसडीएमकडे अधिकार आहेत, मग महाराष्ट्रात स्वतंत्र पडताळणी समितीची गरज काय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## विकास प्रकल्पाला पी.के.आण्णांचे नाव

पत्रव्यवहार आणि बैठकांच्या माध्यमातून हा विषय लावून धरला होता.आमदार पाडवी यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आणि प्रयत्नांतील गांभीर्यामुळे हा महत्त्वपूर्ण विषय आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे.शासनाकडून धोरणात्मक मंजुरी मिळताच तापी खोरे विकास प्रकल्पाला अण्णासाहेबांचे नाव देण्याची औपचारिक घोषणा होण्याची दाट शक्यता आहे.तापी खोरे विकास प्रकल्पाला अण्णासाहेब पी. के. पाटील यांचे नाव मिळण्याच्या मार्गातील अडसर दूर होत असल्याने आणि शासनाकडून सकारात्मक संकेत मिळाल्याने तळोदा व शहादा तालुक्यातील शेतकरी, लोकप्रतिनिधी आणि आम नागरिकांमध्ये अत्यंत आनंदाचे व समाधानाचे वातावरण पसरले आहे. आमदार राजेशदादा पाडवी यांच्या या यशस्वी पाठपुराव्याबद्दल आणि जनभावनेचा आदर केल्याबद्दल सर्वस्तरातून त्यांचे कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

## दगडफेक प्रकरणी अखेर गुन्हे दाखल

जमावावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गैरकायद्याची मंडळी जमवून दंगल घडवणे, पोलिसांच्या आणि हासिम काकर यांच्या घराच्या दिशेने अंधाधुंद दगडफेक करणे, गाड्यांची जाळपोळ करणे आणि बंदोबस्तावर असलेले पोलीस उपनिरीक्षक राजन दुसाणे, पो.कॉ. हर्षद बागुल व पो.कॉ. हिरालाल सूर्यवंशी यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने गंभीर दुखापत करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक दिनेश सोनवणे स्वतः करत आहेत.

तिसरी फिर्याद - धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी (गुन्हा रजि. क्र. २४५/२०२६):- आसिफ रजाक पिंजारी (वय ३६, रा. रजा कॉलनी) यांच्या तक्रारीवरून हासिम नसीर काकर याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १९६, २९९ आणि ३०२ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. संशयिताने व्हॉट्सपवर चिथावणीखोर व्हिडिओ स्टेटस ठेवून मोहम्मद पैगंबर आणि इतर धार्मिक प्रतीकांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्ये केली, तसेच दोन धार्मिक पंथांमध्ये तेढ निर्माण करून धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक अविनाश दहिफळे यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.वरील गुन्ह्यात सात जणांना अटक करण्यात आली असून एकाला दोन दिवसांची तर उर्वरित सहा जणांना चार दिवसांची पोलीस कस्टडी सुनावण्यात आली आहे. दोंडाईचा शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांनी कडक बंदोबस्त तैनात केला असून, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि शांतता बाळगावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## पाच लाखात फसवणूक

क्रमांकावरून कॉल आले. त्यांनी आकर्षक नफा देण्याचे, चॅनेल पार्टनर बनविण्याचे आमिष दाखविले. आश्वासन देवुन मितेश सेठिया यांचा विश्वास संपादन केला. त्यांच्याकडून ऑनलाइन पाच लाख रुपये मागवून घेतले, ते परत न देता फसवणूक केली.चौकशी अंती फसवणूक झाल्याचे मितेश सेठिया यांच्या निदर्शनास आले. १५ जुलै २०२६ पूर्वी हा प्रकार घडला. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक सुरेशकुमार घुसर तपास करीत आहेत.

## काँग्रेसचे अच्छे दिनवर आंदोलन

पूर्ण कचरा झाला असूनही इंधनाचे (पेट्रोलचे) दर १ रुपयानेही कमी केलेले नाही, उलटपक्षी ते वाढवले आहेत, असा घणाघाती आरोप त्यांनी केला.तसेच, देशांतर्गत साखरेचा तुटवडा निर्माण झाल्यावर मुद्दाम ३ महिने उशिराने ब्राझीलकडून कच्ची साखर आयात करण्याचा निर्णय दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी घेण्यात आला आहे. ती भारतात येऊन प्रक्रियेनंतर प्रत्यक्ष बाजारात येईपर्यंत ६० ते ७५ दिवसांचा कालावधी लागणार आहे. मधल्या काळात आपल्या मर्जीतील उद्योगपती मित्रांचा फायदा करून देण्यासाठी हा खेळ खेळला जात असल्याचे नेत्यांनी स्पष्ट केले. काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी शिवतीर्थ परिसरात जाऊन रस्त्यावरील नागरिक, वाहनधारक व व्यापाऱ्यांना साखर भरवून आंदोलन केले. स्वतःच्या पैशाने तोंड गोड करणे आता अशक्य झाल्याने काँग्रेसतर्फे हे तोंड गोड केले जात आहे, असा टोला लगावला असता, उपस्थित नागरिकांनीही हसत साखर खाऊन या अनोख्या व्यंग्यात्मक आंदोलनाला दाद दिली व सरकारविरोधात तीव्र असंतोष व्यक्त केला.या आंदोलनात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष तथा निवृत्त आयएएस अधिकारी आदरणीय भा. ई. नगराळे साहेब, प्रदेश चिटणीस डॉ. दरबारसिंग गिरासे, ज्येष्ठ नेते रमेशअण्णा श्रीखंडे, धुळे शहर काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष सुधीर जाधव, पितांबर महाले, कार्याध्यक्ष मुझफ्फर हुसेन, साक्री तालुक्याचे अध्यक्ष, भानुदास गांगुर्डे राजेंद्र खैरणार, रवींद्र सोनावणे, माजी नगरसेवक अमीन पटेल, अबोलास शेख, धुळे शहर काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष किशोर वाकळे यांच्यासह काँग्रेसच्या विविध आघाड्यांचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरुन

## मोटारसायकलीसह तीन गुन्हे उघड

अधीक्षक अशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोलीस उपनिरीक्षक मुकेश पवार, महेश निकम, विकास गुंजाळ, पोलीस हवालदार दादाभाऊ वाघ, ज्ञानेश्वर पाटील, मोहन ढमढेरे, तसेच पोलीस अंमलदार सचिन सैंदाणे, निशीगंध गवळे आणि राहुल पांढारकर यांच्या पथकाने केली.

## भिल्ल समाजाचा मेळावा संपन्न

ठाकरे, मंगेश बर्डे, सुरजीत ठाकरे या मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. उनपदेव या ठिकाणी वन विभाग व आदिवासी भिल समाजाच्या संयुक्त विद्यमानाने विविध वृक्षांची लागवड करून वृक्ष संवर्धन करण्याची स्थानिक लोकांनी ग्वाही दिली. यानंतर कार्यक्रमात सामाज हित, समाजाची संस्कृती, समाजाची विविध अंगाने शैक्षणिक प्रगती घडून आणण्याच्या संदर्भात मान्यवरांनी चर्चा करून मार्गदर्शन केले. यावेळी आदिवासी भिल्ल कर्मचारी संघाची स्थापना करण्यात आली. शहादा तालुका अध्यक्ष म्हणून वसंतराव नाईक उच्च माध्यमिक विद्यालय येथील प्रा.ए एम वळवी यांची एकमताने निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारणी ही काही दिवसात जाहीर करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी शहादा तालुक्यातील आदिवासी भिल्ल समाजातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप ठाकरे यांनी तर आभार मनोहर नाईक यांनी मानले.

## कृषी क्षेत्रात जगाला भारताकडून..

श्री. उमेश खांडबहाले यांची व्याख्याते म्हणून विशेष उपस्थिती होती. मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य तथा शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालिका डॉ. संजीवनी महाले, विद्यापीठ माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष तथा विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. सुरेंद्र पाटोळे, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. नितीन ठोके, केंद्र संयोजक श्री. हेमराज राजपूत, विद्यापीठ माजी विद्यार्थी संघाचे सरचिटणीस डॉ. संतोष साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले विद्यापीठाच्या कृषि विज्ञान विद्याशाखेचे माजी संचालक डॉ. सूर्या गुंजाळ यांनी आपल्या भाषणात विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्राच्या प्रगतीचा सुरुवातीपासूनचा धावता आढावा सादर केला. असा मेळावा दरवर्षी घेण्यात यावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य तथा शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालिका डॉ. संजीवनी महाले यांनी विद्यापीठ व कृषि विद्यान केंद्र सदैव विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी तत्पर असल्याची ग्वाही दिली. माजी विद्यार्थी व सध्या पश्चिम बंगाल येथे आयपीएस अधिकारी म्हणून कार्यरत असलेले उमेश खांडबहाले यांनी आपल्या ऑनलाईन व्याख्यानात आपल्या यशात मुक्त विद्यापीठ व कृषि विज्ञान केंद्राचाही वाटा असल्याचे सांगितले. कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. नितीन ठोके यांनी शेतात प्रत्यक्ष काम करणारे विद्यार्थी आमच्यासाठी शिक्षक असल्याचे सांगितले.

## पान १ वरुन

## राज्य कार्यकारिणीची आज बैठक

असा कायदा रद्द करण्याचा काही आमदारांनी चंग बांधला आहे. त्यावर सर्वोदय मंडळाची भूमिका आणि रणनीति निश्चित होईल. प्रदेश सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष रमेश दाणे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीस राज्यातील जिल्हा अध्यक्ष,सचिव, पदाधिकारी, महामंत्री बजरंग सोनवणे (मुंबई) सर्व सेवा संघाचे कार्यकारी विश्वस्त शेख हुसेन, मंत्री ॲड.अविनाश काकडे, ज्येष्ठ कार्यकर्ते व नेते शंकरराव बगाडे, डॉ.सुगन बरंठ, शैलाताई सावंत, भूदान मंडळाचे सेक्रेटरी एकनाथ डंगवाल, लताताई राजपूत, माया धांडे आदी उपस्थित राहणार आहेत.बैठकीचे स्वागताध्यक्ष धुळे जिल्हा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष मधुकर शिरसाठ आहेत.

## भाजपची बारा वर्षांची इमेज..

**कायदेविषयक राजकीय भाष्यकार ॲड.असीम सरोदे यांनी पत्रकार परिषदे प्रसंगी व्यक्त केले.**

आय.एम.ए.हॉल येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदे प्रसंगी ॲड. सरोदे यांच्या समवेत ॲड.राहुल वाघ, गौतम पगारे, सचिन दीक्षित, प्रा.शरद पाटील उपस्थित होते. राजकारणाची सद्यस्थिती व आव्हानांनी व्यापलेली लोकशाही या विषयावर न्याय-स्वराज्य संवाद साठी ॲड. सरोदे धुळ्यात आले असतांना बोलत होते. या वेळी ते पुढे म्हणाले की, न्याय-स्वराज्य यातील न्याय सर्व जाणतात स्वराज्य हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य संकल्पनेपासुन प्रेरीत आहे. अन्यायाला दुर करून स्वत:चे राज्य निर्माण करणे हा या उपक्रमा मागचा हेतू आहे. त्यासाठी राज्यभर दौरा सुरू आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विधी महाविद्यालयांमध्ये कायद्याची प्रयोगशाळा सुरू करण्यात येणार आहे. व्यक्ती केंद्रीत राजकारण धोकादायक आहे. लोकशाही शुध्द झाली पाहिजे तसेच सर्वच राजकीय पक्ष टिकले पाहिजेत. कट्टरवादही संपवला पाहिजे मग तो हिंदू असो की, मुस्लीम. मी पणाचा मेंढा मुख्यमंत्री फडणवीसांनी मिरवणे बंद केले पाहिजे. मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री अमीत शहा यांनी राज्याचे बिघडलेले वातावरण सुधारले पाहिजे. संसदेत चर्चेसह राजकीय निवृत्तीचे वय प्राधान्य क्रमाने ठरल पाहिजे. वकीली व्यवसाय व्यतिरिक्त राजकारणात आशेचा किरण दिसतो का ? आणि कॉक्रोचचे नेतृत्व स्विकारणार का ? असा परखड सवाल आमच्या प्रतिनिधीने उपस्थित केला असता ॲड.सरोदे यांनी कोणतीही निवडणूक लढणार नसल्याचा खुलासा केला. तसेच निवडणूक लढणार नाही पण पाडणार निश्चित अशी भूमीका स्पष्ट केली.

## तरुणावर चाकूने वार

नितीन गवळीने मोटरसायकल व्यवस्थित चालवा, असे सांगितले, त्यावरून संशयित सुरज खांडेकर याने चाकुने वार केला. नितीन गवळी याने वार चुकवल्याने पोटाला दुखापत न होता पायाला गंभीर दुखापत झाली. घटनास्थळी गर्दी झाल्यानंतर संशयित सुरज खांडेकर मोटरसायकलीने पसार झाला. या याप्रकरणी नितीन गवळी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार संशयित सुरज खांडेकर याच्याविरुद्ध तुळशीहार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

## पान १ वरुन

## नरडाणेत एटीएम फोडले

सहाय्याने पळवून नेले. घटना उघडकीस येताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. प्राथमिक तपासानुसार चोरटे चारचाकी वाहनातून धुळ्याच्या दिशेने पसार झाल्याचा संशय आहे. त्यादृष्टीने पोलिसांनी परिसरातील आणि महामार्गावरील मुख्य रस्त्यांवर नाकेबंदी केली असून तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. घटनेचे गांभीर्य ओळखून घटनास्थळी डॉग स्क्वॉड (श्वान पथक) आणि फिंगरप्रिंट तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले आहे. ठसे आणि इतर महत्त्वाचे पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. तसेच महामार्ग आणि परिसरातील इतर दुकानांचे फुटेज पोलीस तपासत असून, चोरट्यांचा माग काढला जात आहे. मोठ्या गवात थेट एटीएम मशीनच उखडून नेल्याने स्थानिक नागरिकांमध्ये सुरक्षेबाबत भीतीचे आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या धाडसी चोरीमागे एखाद्या सराईत टोळीचा हात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. एटीएममधील अचूक रक्कमेचा आणि चोरी गेलेल्या एकूण रकमेचा अधिकृत आकडा बँक प्रशासनाच्या अहवालानंतरच स्पष्ट होईल. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस युद्धपातळीवर करत आहेत.

## ॲड.असीम सरोदे यांनी दिली भेट

परराज्यातून महाराष्ट्रात येणारा गुटखा हा धुळे जिल्ह्यातून जात असून त्यावर पोलीस प्रशासनाकडून कारवाई केली जाते मात्र ही तस्करी होण्यामागे मुख्य असलेल्या सूत्रधार कोण याचा देखील पोलिसांनी शोध घेण्याची मागणी ॲड.गोरे यांनी या आंदोलनातून केली आहेॲड.गोरे यांच्या सुरू असलेल्या या आंदोलनाला ॲड. असीम सरोदे हे धुळ्यात आलेले असताना त्यांनी भेट देऊन अवैध धंदेविरोधात माहिती जाणून घेतली, तसेच अवैध धंद्याविरोधात न्यायालयात जाण्याची वेळ आल्यास आपण सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन देखील असीम सरोदे यांनी यावेळी एडवोकेट पंकज गोरे यांना दिले तसेच धुळे जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर विमल आणि गुटख्याची तस्करी होत असल्याची माहिती एडवोकेट पंकज गोरे यांनी असीम सरोदे यांना दिल्यानंतर त्यांनी याबाबत अन्न औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याशी आपण संवाद साधून याबाबत तात्काळ कारवाई करण्याची मागणी करणार असल्याचे सांगितलेया आंदोलनाची दखल घेतली न गेल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा एडवोकेट पंकज गोरे यांनी दिला आहे. यावेळी तेजस गोटे,संदीप सूर्यवंशी, शेखर वाघ,पंकज भारस्कर, सागर साळवे, दिलीप चित्ते,सूरज भावसार,संदिप चौधरी,कार्तिक पाटील,संजय पाटील,विनोद रनमले,प्रवीण मुर्तडक,मनोज गवळी, बंटी गोरे,आप्पा लहामगे,गोपी सोनार,विशाल ढेकळे, गणेश पाखले, स्वप्नील सोनवणे, सौरभ जवराल,यांच्या सह विद्यार्थी-तरुण, ज्येष्ठ धुळेकर , रोडगाडीधारक, टपरी धारक बंधू भगिनी उपस्थित होते.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

## कर्करोग प्रतिबंधात्मक लसीचा डोस

(पान १ वरुन) या उपक्रमामुळे कर्करोग प्रतिबंधाबाबत जनजागृती होण्यास मोठी मदत झाली आहे. भविष्यातही मुली व महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देणारे लसीकरण, आरोग्य तपासणी आणि जनजागृतीचे उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा मानस आयोजकांकडून व्यक्त करण्यात आला. शिरपूर तालुक्यातील मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला आहे.

या प्रसंगी हॉस्पीटल सीईओ डॉ. संतोष पवार, डॉ. मनिषा गोड, डॉ. मोनिका अग्रवाल, समन्वयिका सौ. सोनिया भसीन, स्वीय सहाय्यक योगेश्वर माळी, सौ. कमलजीत ओबेरॉय, पां.बा. माळी म्युनसिपल हायस्कूलच्या जे. एस. सोनवणे, हॉस्पिटल चे डॉक्टर व नर्स तसेच पां.बा. म्युनसिपल शाळेचे शिक्षिका व अस्तित्व टीम उपस्थित होते.

**झाडे लावा झाले जगवा**




**पाहिजेत**
आयटीआय झालेला मुलगा शिकाऊ टर्नर, वेल्डर पाहिजे
संपर्क:- शाह इंजिनिअरिंग वर्ल्स ॲण्ड मशिनरी पार्टस्
सुबानी मस्जिद बाजुला लोहा बाजार ८० फुटी रोड, धुळे
मो. 9403474944
9423474740

**WANTED**
La Pino'z Pizza
* पदे :
* किचन स्टाफ
* कॅशियर
इच्छुक उमेदवारांनी Resume सोबत घेऊन प्रत्यक्ष भेट द्यावी.
La Pino'z Pizza
नेहरू नगर, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे.
संपर्क / Whats-App : 8412058993

**पाहिजेत**
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजे
-: समक्ष भेटा :-
सुपर सर्वोसेंटर इंडियन ऑईल पंप
पांझरा पोळ समोर, पारोळा रोड, धुळे

**प्लॉट विकणे आहे**
धुळे जमनागिरी दत्तमंदिर लगतचे २ प्लॉट ओपन स्पेस लागून सुमारे ११००० स्क्वे. फुट प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
9403532858

**शेती विकणे आहे**
दोंडाईचा तावखेडा ता.शिंदखेडा येथील तापी काठची क्लिअर टायटल शेत जमीन विकणे आहे. गट नं.५३ क्षेत्र २ हेक्टर्स ४७ आर व गट नं.६९/१ क्षेत्र ६२ आर.
-: संपर्क धुळे :-
9403532858

**पाहिजेत**
रेडिमेड दुकान कामासाठी काम करणारी सेल्समन मुले लावणे आहे भेटा
-: संपर्क :-
श्रीसत्यनारायण ड्रेसेस
जैन मंदिराजवळ धुळे
9403744965

**पाहिजेत**
कापड दुकानासाठी अनुभवी सेल्समन पाहिजे. आकर्षक पगार
गिरधारी होजअरी
जेन्टस/लेडीज
बाटा शोरूम समोर
नगर पालिकाजवळ, धुळे
9420370793
9271280899

**पाहिजेत**
१) वेटर - ३
२) सिक्युरीटीगार्ड (वाचमन)- १ नाईट (रात्रपाळीसाठी)
हॉटेल न्यू नालंदा
अभय युवा कॉलेज समोर, मुंबई-आग्रा हावे-३,
9637130555
9158630555

**पाहिजेत**
दुकान कामासाठी माणूस/मुलगा पाहिजे पार्ट टाईम/फुल टाईम
-: समक्ष भेटा :-
अन्नपूर्णा जलगाववाला
मावा कुल्फी. आग्रा रोड, गांधी चौक, धुळे




हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०